## बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक २७ | बुधवार, दि.१२ जून २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# एनडीए सरकारच्या मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर

## रस्ते विकास नितीन गडकरींकडे, शिवराज सिंह चौहान यांच्याकडे कृषी मंत्रालय

**नवी दिल्ली :** नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील तिसऱ्या मंत्रिमंडळाचा खातेवाटप जाहीर करण्यात आला असून अमित शाह यांच्याकडे गृहखाते व सहकार खाते कायम ठेवण्यात आले आहे. सर्व महत्त्वाची खाती भाजपने वरिष्ठ मंत्र्यांकडे दिली असून मोदींच्या तिसऱ्या मंत्रिमंडळात नितीन गडकरी यांना पुन्हा रस्ते आणि परिवहन वाहतूक मंत्रालय, अमित शाह यांना गृह, एस जयशंकर यांना परराष्ट्र, राजनाथ सिंह यांना संरक्षण आणि अश्विनी वैष्णव यांना रेल्वे मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी नवीन एनडीए आघाडी सरकारच्या ७१ मंत्र्यांसह शपथ घेतली होती. मोदींच्या या तिसऱ्या मंत्रिमंडळात ३० कॅबिनेट मंत्री, पाच जणांकडे स्वतंत्र प्रभार आणि ३६ राज्यमंत्री आहेत. मोदी मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीनंतर भाजपने गृह मंत्रालय, संरक्षण मंत्रालय आणि परराष्ट्र मंत्रालय स्वतःकडे ठेवल्याचे स्पष्ट झाले आहे. सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्ती वेतन मंत्रालय, अणुऊर्जा विभाग, अंतराळ विभाग, सर्व महत्त्वाचे धोरणात्मक मुद्दे आणि इतर सर्व पोर्टफोलिओ जे कोणत्याही मंत्र्याला दिलेले नाहीत, या सर्व खात्यांचा कार्यभार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आहे.



## केंद्रीय मंत्री मंडळाचे खातेवाटप

| | |
|---|---|
| अमित शाह– | गृहमंत्रालय |
| राजनाथ सिंह– | संरक्षण मंत्रालय |
| एस जयशंकर – | परराष्ट्र |
| नितीन गडकरी– | रस्ते आणि वाहतूक |
| निर्मला सीतारमन – | अर्थमंत्रालय |
| शिवराज सिंह चौहान– | कृषी मंत्रालय |
| जतीन राम– | सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय |
| पियुष गोयल – | वाणिज्य |
| अन्नपूर्णा देवी– | महिला आणि बाल विकास मंत्रालय |
| भूपेंदर यादव – | पर्यावरण |
| अश्विनी वैष्णव– | रेल्वे मंत्रालय |
| के राममोहन नायडू– | नागरी उड्डाण मंत्रालय |
| जेपी नड्डा– | आरोग्य मंत्रालय |
| सर्वानंद सोनोवाल – | पोर्ट शिपिंग मंत्रालय |
| सी आर पाटील– | जलशक्ती |
| किरण रिजीजू– | संसदीय कार्यमंत्री |
| धर्मेंद्र प्रधान– | शिक्षण मंत्री |
| अर्जुनराम मेघवाल– | कायदा मंत्री |
| चिराग पासवान – | क्रीडा मंत्री, अन्न प्रक्रिया मंत्री |
| प्रल्हाद जोशी – | ग्राहक कल्याण मंत्रालय |
| गिरिराज सिंह – | टेक्सटाइल मंत्रालय |
| ज्योतिरादित्य शिंदे– | सूचना आणि प्रसारण मंत्री |
| मनसुख मंडाविया– | कामगार मंत्री |
| हरदीप सिंह पुरी– | पेट्रोलियम मंत्री |
| एचडी कुमारस्वामी – | अवजड उद्योग मंत्री |
| मनोहर लाल खट्टर– | उर्जा मंत्री, गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्रालय |
| राजीव राजन सिंह – | पंचायत राज मंत्रालय |
| विरेंद्र कुमार – | सामाजिक न्याय मंत्रालय |
| ज्युएल ओराम– | आदिवासी विकास मंत्री |
| गिरीराज सिंह – | वस्त्रोद्योग मंत्रालय |
| गजेंद्रसिंह शेखावत– | सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्रालय |
| किशन रेड्डी – | कोळसा आणि खाणकाम मंत्रालय |

### राज्यमंत्री स्वतंत्र कारभार

| | |
|---|---|
| राव इंद्रजित सिंह– | नियोजन, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय |
| जितेंद्र सिंह – | विज्ञान आणि तंत्रज्ञान, पंतप्रधान कार्यलय |
| अर्जुन राम मेघवाल – | कायदा आणि न्याय मंत्रालय |
| प्रतापराव जाधव – | आयुष मंत्रालय |
| जयंत चौधरी – | कौशल्य विकास |

### राज्यमंत्री

| | |
|---|---|
| श्रीपाद नाईक– | गृहनिर्माण आणि ऊर्जा राज्यमंत्री |
| शोभा करंदाजे – | सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय |
| शांतनु ठाकुर – | पोर्ट शिपिंग मंत्रालय, राज्यमंत्री |
| रवनीत बिट्टू– | अल्पसंख्यांक राज्यमंत्री |
| जितीन प्रसाद – | वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय |
| कृष्णन चौधरी– | सहकार मंत्रालय |
| रामदास आठवले – | सामाजिक न्याय मंत्रालय |
| नित्यानंद राय– | गृह मंत्रालय |
| अनुप्रिया पटेल – | आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय |
| व्ही सोमन्ना – | जलशक्ती, रेल्वे मंत्रालय |
| चंद्रशेखर प्रेमासनी– | ग्रामीण विकास मंत्रालय |
| एस पी बघेर – | दुग्ध विकास मंत्रालय |
| क्रितीवर्धन सिंह – | पर्यावरण |
| बी एल वर्मा – | सामाजिक न्याय |
| सुरेश गोपी – | पेट्रोलियम, पर्यटन |
| एल मुरुगन– | माहिती आणि प्रसारण |
| अजय तम्ता – | रस्ते वाहतूक |
| बंदी संजय कुमार – | गृहमंत्री |
| कमलेश पासवान – | कोळसा मंत्रालय |
| सतीश चंद्र दुबे – | खणन मंत्रालय |
| संजय सेठ – | संरक्षण राज्यमंत्री |
| रणवीर सिंह – | अन्न प्रक्रिया |
| दुर्गादास उइके– | आदिवासी विकास मंत्रालय |
| रक्षा खडसे – | युवक कल्याण मंत्रालय |
| सुकांता मुजुमदार – | शिक्षण |
| सावित्री ठाकुर – | महिला आणि बालकल्याण |
| तोखन साहू – | शहर विकास मंत्रालय |
| भूषण चौधरी – | जलशक्ती |
| भूपेंद्र राजू श्रीनिवास वर्मा – | अवजड उद्योग मंत्रालय |
| हर्ष मल्होत्रा – | कॉर्पोरेट अफेअर्स |
| निमुबेन जयंतीभाई बांभनिया – | ग्राहक निवारण आणि अन्न वितरण |
| मुरलीधर मोहोळ – | सहकार , नागरी उड्डाण मंत्रालय |
| जॉर्ज कुरियन – | अल्पसंख्याक |
| पबित्रा मार्गारिट – | परराष्ट्र |

# पाच हजार विद्यार्थिनींचा उपस्थिती भत्ता बंद

## शासनाने योजना केली बंद, विद्यार्थिनींना बसला फटका, नवीन योजना सुरु

**गोंदिया:** जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पहिली ते चौथीपर्यंत दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थिनींना देण्यात येणारा उपस्थिती भत्ता योजना बंद करण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्यातील सुमारे ५ हजार विद्यार्थिनींना फटका बसला आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्र शासनाच्या माध्यमातून अनेक योजना राबविल्या जातात. त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर योजना रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची माहिती आहे.

दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थिनींना शाळेची गोडी लागून विद्यार्थिनींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी विद्यार्थिनींना एक रुपया प्रति दिवसाप्रमाणे किमान ७५ टक्के उपस्थिती असलेल्या विद्यार्थिनींना २२० रुपये देण्यात येत होते. १९९२ मध्ये तत्कालीन राज्य शासनाने ही योजना सुरु केली होती. गत ३० वर्षात या योजनेत कोणतीही आर्थिक वाढ करण्यात आली नाही. या काळात अनेक सत्ताधारी आले. मात्र, असंवेदनशील सत्ताधाऱ्यांनी योजनेत आर्थिक वाढ करण्याची तसदी दाखविली नाही. ही योजना मागील तीन दशकांपासून अविरत सुरु होती. कोरोना महामारीच्या २ वर्षात उपस्थिती भत्ता मिळाला नसल्याचे पालकांचे म्हणने आहे. गेल्या दोन वर्षापासून अधिकृतपणे योजना बंद करण्याचा निर्णय राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने घेतला. शैक्षणिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या शालेय शिक्षण विभागाशी संबंधित जवळपास १४ योजना रद्द करुन काही योजनांची फेररचना करण्यात आली आहे. गोंदिया जिल्ह्यात आदिवासी आणि गैरआदिवासी क्षेत्रात सदर योजना राबविण्यात येत होती. योजनेंतर्गत अनुसूचित जातीजमाती, व्हीजेएनटी, एसबीसी व मागास प्रवर्गातील दारिद्र्य रेषेखालील पहिली ते चौथीच्या विद्यार्थिनींना दैनिक १ रुपये उपस्थिती भत्ता देण्यात येत होता. मागील शैक्षणिक वर्षात जिल्ह्यातील जवळपास ४ हजार ५४५ विद्यार्थिनी योजनेच्या लाभार्थी होत्या. योजना बंद झाल्याने गरीब कुटूंबातील विद्यार्थिनींना शिक्षण घेताना आर्थिक झळ बसली आहे.

### आता योजनांवर दिला जातोय भर

**जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून जिल्हा परिषेच्या शाळांची इमारत, वर्गखोल्यांची दुरुस्ती व बांधकाम, स्वच्छतागृहाचे बांधकाम, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प व स्वच्छतागृहांचे बांधकाम, पिण्याचे शुद्ध पाणी, शालेय स्वच्छता, वाचनालय, शैक्षणिक बोलक्या भिंती निर्माण करणे, क्रीडांगण, पटांगण, संरक्षण भिंत, आदर्श शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करणे, विज्ञान व संगणक प्रयोगशाळा, इंटरनेट, वायफाय सुविधा उपलब्ध करुन देणे आदि योजना राबविण्यात येत आहेत.**

# गडचिरोलीत तब्बल २ हजार कोटींच्या भूखंडांना अवैध परवानगी?अर्चना पुट्टेवारच्या अटकेंनंतर भूमाफिया अडचणीत

**गडचिरोली :** सासऱ्याची सुपारी देऊन हत्या केल्याच्या आरोपाखाली पोलीस कोठडीत असलेली गडचिरोली येथील नगररचना विभागाची सहायक संचालक अर्चना मनीष पुट्टेवार (पार्लेवार) हिने नियमात बसत नसलेल्या जिल्ह्यातील तब्बल २ हजार कोटी इतक्या किमतीच्या भूखंडांना परवानगी दिल्याची चर्चा प्रशासकीय वर्तुळात आहे.

अटकेनंतर या महिला अधिकाऱ्याच्या कारनाम्यांची जिल्हाभर चर्चा असून चौकशीच्या भीतीने भुमाफियांचे धाबे दाणाणले आहे. सुमारे ३०० कोटी रुपयांच्या मालमत्तेसाठी सुपारी देऊन ८२ वर्षीय वृद्ध सासऱ्याची थंड डोक्याने हत्या केल्याच्या आरोपाखाली येथील नगररचना विभागाची सहायक संचालक अर्चना मनीष पुट्टेवार (पार्लेवार) हिला ६ जून रोजी नागपूरात अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, गडचिरोलीत तीन वर्षांपूर्वी ती रुजू झाली होती.तिच्या कार्यकाळात भूमाफियांनी पूररेषेतही एन. ए.चे परवाने घेऊन बेकायदेशीररीत्या भूखंड टाकले. तेथे आज मोठमोठ्या इमारती उभ्या आहेत. यामुळे तेथे राहणाऱ्या नागरिकांना पुराचा धोका निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. नगररचना विभागाकडून नियम पायदळी तुडवत एन.ए.चे परवाने देण्याचा सपाटा अर्चना पुट्टेवार हिच्या कार्यकाळात झाल्याची माहिती समोर आली आहे.




गडचिरोली, अहेरीसह कुरखेडा, देसाईगंजातील बेकायदेशीर लेआऊटला मंजुरी दिली गेली. यातून मोठी "उलाढाल' झाल्याची शंका उपस्थित केली जाऊ लागली आहे. कुरखेडा तालुक्यातील गोठणगाव येथे एका राष्ट्रीय पक्षाच्या कथित नेत्याचे पूररेषेतील पाच ले–आऊट यापूर्वीच्या अधिकाऱ्यांनी नाकारले होते. मात्र, अर्चना पुट्टेवारने ते मंजूर केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

अर्चना पुट्टेवारने हिने महत्वाच्या राजकीय पक्षाशी संबंधित लोकांनाच हाताशी धरून बेकायदेशीर एनए परवाने देण्याचा सपाटा लावला होता, अशी माहिती सूत्रांनी दिली. यासंदर्भात नगररचना कार्यालयात विचारणा केली असता ते काहीही बोलण्यास तयार नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मागील तीन वर्षात गडचिरोलीत २५, देसाईगंज ३५ तर अहेरी उपवीभागात जवळपास ४० भूखंडांना अवैधपणे परवानगी दिल्या गेली आहे. यात अहेरी आणि देसाईगंज येथील दोन भूमाफीयांनी महत्वाची भूमिका बजावली आहे.

# विधानपरिषद निवडणुकीवरुन मविआत खडाजंगी

**मुंबई :** महाविकास आघाडीमध्ये पुन्हा एकदा नाराजी नाट्य पाहायला मिळत आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीवरून काँग्रेसमध्ये तीव्र संताप आहे. लोकसभेप्रमाणेच ठाकरे गटाने विधान परिषदेच्या चारही जागा परस्पर घोषित केल्याने काँग्रेसमध्ये प्रचंड नाराजी आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानपरिषदेचे उमेदवार मागे घ्या, असा निरोप दिला आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी एबीपी माझाला माहिती दिली आहे.

महाविकास आघाडी असताना घोषणा करण्याच्या आधी चर्चा केली पाहिजे होती अशी काँग्रेसची भूमिका आहे. मुंबईतून विधानपरिषदेसाठी अर्ज भरलेले शिवसेना उबाठाचे उमेदवार ठाकरेंनी कायम ठेवावेत. मात्र कोकण पदवीधर आणि नाशिक शिक्षक उमेदवार ठाकरेंनी मागे घ्यावेत,असा निरोप नाना पटोलेंनी उद्धव ठाकरेंना दिला आहे. चारही ठिकाणी चर्चा न करता उमेदवार दिल्याने काँग्रेसमधे नाराजी आहे. उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेमुळे काँग्रेसचे प्रभारी रमेश चन्नीथला आणि काँग्रेस नेते संतप्त आहेत.

पटोलेंचा फोन घेणे ठाकरेंनी टाळले? नाना पटोले म्हणाले, ते लंडनमध्ये गेले त्यावेळी देखील फ़ोन केला. त्याचवेळी मी त्यांना म्हणाले दोन जागा तुम्ही लढा दोन जागा मी लढतो. त्यावेळी ते म्हणाले तुमचे उमेदवार कोण आहेत? मग मी उमेदवारांची नावे सांगितली. मूळ प्रश्न आहे की, चर्चा करुन जागावाटप केले असते तर या चारही जागा निवडून येणे सोपे झाले असते. मी सकाळपासून त्यांना फोन लावण्याचा प्रयत्न करत आहे.मात्र त्यांचे ऑपरेटर साहेब तयार होत आहेत असाच निरोप देत आहे. माझ्याशी उद्धव ठाकरेंचा संपर्क झाला नाही. त्यामुळे नेमके त्यांच्या मनात काय आहे हेच कळत नाही.

आम्ही मुंबईत उमेदवार दिले नाही. परस्पर त्यांनी त्यांचे उमेदवार जाहीर केले. महाविकास आघाडी म्हणून ही निवडणूक लढवावी अशी काँग्रेसची भूमिका आहे, असे पटोले म्हणाले. कोकण पदवीधर आणि नाशिकच्या जागेसाठी काँग्रेस आग्रही आहे. मात्र लोकसभा जागा वाटपाच्या प्रमाणे उद्धव ठाकरे यांनी परस्पर उमेदवार घोषीत केल्याने काँग्रेस नेत्यांमध्ये तीव्र संताप आहे. मुंबईची जागा काँग्रेस शिवसेना उद्धव ठाकरे गटाला सोडण्यास तयार आहे.

# केंद्राकडे अडकला खोलीकरणाचा प्रस्ताव

## वर्षभरातून तीनच महिने उपलब्ध असते पाणीसाठा, पांगोली नदीचे पात्र झाले अरुंद

**गोंदिया:** गोंदिया आणि आमगाव तालुक्यातील १०० पेक्षा अधिक गावांसाठी पांगोली नदी जीवनदायिनी आहे. मात्र गत काही वर्षापासून नदीचे पात्र अरुंद झाले आहे. ठिकठिकाणी झुडुपे वाढली असून अनेक ठिकाणी नदीपात्रात अतिक्रमण झाले. त्यामुळे नदीचे अस्तित्वच धोक्यात आले. वर्षातून केवळ तीन महिनेच नदीत पाणी असते. त्यामुळे नदीला पुनर्जिवीत करण्याची मागणी होत आहे. जिल्हा प्रशासनाने देखील खोलीकरणाचा प्रस्ताव तयार केला. तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे. मात्र अद्यापही खोलीकरणाला मंजूरी मिळाली नसल्याने नदीच्या गतवैभवासाठी पुन्हा किती वाट बघावी लागणार? असा सवाल उपस्थित होत आहे.



पांगोली नदीचा उगम गोरेगाव तालुक्यातील तेढा या गावातून झाला. या नदीत पुर्वी बारमाही पाणी राहत होते. गोरेगाव, गोंदिया आणि आमगाव तालुक्यातील शंभरावर गावे या नदीच्या पाण्यामुळे समृद्ध झाली होती. ही नदी मध्य प्रदेशाच्या सीमेवर असलेल्या वाघ नदीला जाऊन मिळते. पांगोली नदीला गोंदिया जिल्ह्यातील जीवनदायिणी म्हणूनही संबोधण्यात येते. मात्र गत काही वर्षांपासून नदीपात्राचे खोलीकरण करण्यात आले नाही. ठिकठिकाणी झालेले अतिक्रमण, जलपर्णी वनस्पतीचे वाढलेले प्रस्थ आणि वाढलेली झुडूपे तसेच उथळ पात्रामुळे नदीत पाणी राहत नाही. केवळ पावसाळ्यातील तीन महिनेच या नदीच्या पात्रात पाणी राहते. त्यानंतर नदी कोरडी पडते. परिणामी नदीचे अस्तित्व आता धोक्यात आले आहे. गेल्या काही वर्षापासून पांगोली नदीच्या संवर्धनाच्या मागणीसाठी काही संस्था झटत आहेत. वारंवार शासन आणि प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. उथळ झालेल्या नदीपत्राचे खोलीकरण करुन जागोजागी बंधारे बांधल्यास नदीत बारमाही पाणी उपलब्ध राहू शकते. त्याच लाभ पिण्यासाठी आणि शेत सिंचनासाठीही होऊ शकते. संस्थांच्या वारंवारच्या पाठपुराव्यामुळे जिल्हा प्रशासनाच्या निर्देशावरुन जलसंधारण विभागाने नदी खोलीकरणाचा प्रस्ताव सादर करुन केंद्र शासनाकडे पाठविला. मात्र अद्यापही त्या प्रस्तावाला केंद्र शासनाची मंजूरी मिळालेली नाही. परिणामी पांगोलीचे गतवैभव परत आणण्यासाठी पुन्हा किती काळ प्रतीक्षा करावी लागणार? हे येणारा काळच ठरविणार आहे.

### ठिकठिकाणी तस्करांनी पोखरले

**पांगोली नदी ज्याप्रमाणे नागरिक, जनावरांची तहान भागविते. त्याचबरोबर शेत सिंचनासाठी या नदीची मोठी मदत होत होती. परंतु गत काही वर्षापासून नदीकाठावर अतिक्रमण होऊन मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. तसेच अनेक ठिकाणी झुडपे वाढल्यामुळे पाण्याच्या प्रवाहावर त्याचा परिणाम होतो. रेतीतस्करांनीही अनेक ठिकाणी नदीचे पात्र पोखरले आहेत. रात्रंदिवस रेती चोरीमुळे या नदीच्या सौंदर्यालाच बट्टा लागला आहे.**

# कधी काढणार बेकायदा स्पीडब्रेकर



**गोंदिया:** शहरातील गल्लीबोळात बसविण्यात आलेले फाबयरचे बेकायदा स्पीडब्रेकर काढण्याचे आदेश न्यायालयाचे आहेत. मात्र गोंदिया शहरात न्यायालयाच्या आदेशाची मोठ्या प्रमाणात अवहेलना करण्यात येत असून जिल्हा सत्र न्यायालयातील न्यायाधिशांच्या शासकीय निवासस्थानासमोरच बेकायदा स्पीडब्रेकर तयार करण्यात आले आहेत.त्यातच या ब्रेकरमुळे गोंदियातील एका महिला नगरसेविकेचाा अपघात सुध्दा झालेला आहे.ज्या मार्गावर हे अवैध ब्रेकर तयार करण्यात आले,त्या मार्गावर शासकीय रुग्णालय असून सार्वजनिक बांधकाम विभाग व नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यानी याकडे कानाडोळा केल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. हे अवैध ब्रेकर शहरातील गल्लीबोळातून काढण्यापेक्षा नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाचे कंत्राटदार सिमेंट रस्ता तयार करतांना १०० ते २०० मीटर अंतरावर बेकायदा स्पीड ब्रेकर तयार करीत असल्याने गती रोखण्यापेक्षा अपघातालाच आमंत्रण देणाऱ्या बेकायदा स्पीडब्रेकर्सचे साम्राज्य शहरभर कायम आहे.

जागोजागी आढळणारे स्पीडब्रेकर्स नागपूरकरांसाठी मन:स्तापाचा विषय होऊ लागला आहे. गल्लीबोळातही असे स्पीडब्रेकर्स रातोरात तयार होऊ लागले आहेत. इंडियन रोड काँग्रेसचे (आयआरसी) सर्व नियम धाब्यावर बसवून लावण्यात आलेले स्पीडब्रेकर नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहेत. उंची, रुंदी आणि प्रकार यानुसार कसे गतिरोधक असावेत याचे नियम ठरलेले आहेत. त्याचा विचार न करता शहरात मुख्य, अंतर्गत नियमांची पायमल्ली करीत गतिरोधक लावण्यात आले आहेत.

या गतिरोधकांमुळे गेल्या काही दिवसांत शहरात लहान–मोठे अपघात घडले आहेत. गतिरोधक हे अपघात टाळले जावेत म्हणून असतात. पण प्रत्यक्षात शहरात सर्वत्र असलेल्या सदोष गतिरोधकांमुळे नेमके याच्या उलट घडत आहे. गतिरोधकावर दुचाकी उसळत असल्याने वाहनासोबतच अपघाताचाही धोका बळावला आहे.

### रंबल स्ट्रीप्स धोकादायक

**इंडियन रोड काँग्रेसच्या निकर्षानुसार शहरात गतिरोधक तयार करताना काही नियम पाळणे बंधनकारक असते. यानुसार उंची ४ इंच आणि उतरत्या मार्गाने साधारणत: ५ फुट लांब असे गतिरोधक असावे. जेणेकरुन वाहन वेगाने आल्यावर गती कमी झाल्यास सुरळीतपणे या गतिरोधकावरुन जाऊ शकेल. या गतिरोधकांवर पांढऱ्या रंगाचे पट्टे ही मारणे आवश्यक आहे. रात्रीच्या वेळी ते रिफ्लेक्टर म्हणून वाहनचालकांना दुरुनच नजरेस पडते. शहरातील ९ मीटर रूंदीचे अर्थात ३० फुट रस्त्यावर असे गतिरोधक तयार करण्यात येते. सध्या रंबल स्ट्रीप्सला परवानगी नाही. सर्वोच्च न्यायालयाने यावर बंदी घातली आहे. पण यानंतरही गोंदिया–कोहमारा मार्गावर फायबरचे धोकादायक असे रंबल स्ट्रीप्स दिसून येतात.**

### आयआरसीचे उल्लंघन

**गतिरोधकावरुन वाहन जात असताना किमान दोन ते तीन फुटांचा स्लोप गतिरोधकाला असावा. हा गतिरोधक शाळा, महाविद्यालय किंवा मुलांची वर्दळ असेल अशा ठिकाणी केला जातो. मुख्य हायवे किंवा वर्दळ असलेल्या रस्त्यांवर पांढरे पट्टे असलेले दिशादर्शक गतिरोधक असावेत. तसेच पांढरे किंवा पिवळे लेअर असलेल्या रंगाचे पट्टे असलेले दुभाजक असावेत. याखेरीज तयार केलेले कुठलेही गतिरोधक अनधिकृत व धोकादायक असल्याचे आयआरसीच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद आहे. याचे सर्रास उल्लंघन सुरु आहे.**

# गोंदियाचे जावई शिवराजसिंह चव्हाणांनी घेतली केंद्रीय मंत्री पदाची शपथ

**गोंदिया:–** गोंदियाचे जावई असलेले मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री व विदिशाचे खासदार शिवराजसिंह चव्हाण यांनी दि.०९ रोजी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारमध्ये केंद्रीय मंत्रीपद–ाची शपथ घेतली.चव्हाण यांनी केंद्रीयमंत्री पदाची शपथ घेताच सासूरवाडी असेलल्या गोंदियाच्या गोरेलाल चौकात फटाके फोडून आतषबाजी करण्यात आली.



पूर्व विदर्भातील गोंदिया हा जिल्हा केवळ वनराईनेच नटलेला नाही तर त्याला एक वेगळे राजकीय वलयही लाभले आहे.मध्यप्रदेशमध्ये १८ वर्षे एक हाती सत्ता राखणारे शिवराज सिंह चौहान गोंदियाचे जावई होत. गोंदियातील मसानी कटुंबाचे जावई असलेले शिवराज सिंह यांच्या पत्नी साधना यांचे गोरेलाल चौकात माहेरघर. २००५ पासून शिवराजसिंह यांची मुख्यमंत्रिपदी निवड वा शपथविधी होत असताना त्यांच्या सासरी गोरेलाल चौक ते दुर्गा चौक या परिसरात फ़टाक्यांची आतषबाजी, ढोलताशांच्या गजरात कुटुंबीयांचे नृत्य, आप्तस्वकियांकडून मिठाईचे वितरण, आदी जल्लोष साजरा केला जायचे.पण २०२३ मध्ये मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्रीपदी मोहन यादव यांच्या नावाची घोषणा झाल्यानंतर मात्र निराशा पसरली होती.त्यानंतर आता परत आज केंद्रीय मंत्री मंडळात चव्हाण यांचा समावेश झाल्याने उत्साह दिसून आला.

शिवराजसिंह चव्हाण हे ६ वेळेस खासदार व ६ वेळ आमदार राहिले आहेत.मात्र केंद्रात पहिल्यादांच ते मंत्री झाले.

## संपादकीय

# हवामान बदलामुळे रोगराईत वाढ

माणूस ज्या प्रकारे पृथ्वीचे शोषण करत आहे, त्याच प्रमाणात स्वतःच्या विनाशाचा मार्ग तयार करत आहे. मानवामुळे होणारे प्रदूषण, हवामानातील बदल, जैवविविधतेचे नुकसान, परकीय प्रजातींचे आक्रमण आणि अधिवासांचे नुकसान यामुळे पृथ्वी मानवासह अनेक जीवांसाठी निर्जन बनली आहे. त्यामुळे अनेक संसर्गजन्य आजार झपाट्याने पसरत आहेत. ते मानवाप्रमाणेच प्राणी आणि वनस्पतींनाही धोका निर्माण करत आहेत. जलवायू परिवर्तनाचा परिणाम सखोल समजून घेण्यासाठी नॉट्रेडेम विद्यापीठातील संशोधकांच्या नेतृत्वाखाली एक नवीन अभ्यास केला गेला. त्याचे परिणाम “नेचर’ या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. शास्त्रज्ञांनी याआधी काही रोगांच्या वाढत्या प्रकरणांवर आणि पर्यावरणातील बदलांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यात मलेरियासारख्या आजारांचा समावेश आहे. मलेरिया पसरवण्यात हवामानबदलाची मोठी भूमिका आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेदेखील त्याला दुजोरा दिला आहे. डास उष्ण आणि कोरड्या हवामानात वाढतात. दुसरीकडे, त्यांचा नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्यामुळे हे रोगकारक जीव मानवी वस्तीच्या जवळ येत आहेत. परिणामी, या रोगांचा धोका वाढत आहे.

मलेरियाच्या बाबतीत अशी अनेक उदाहरणे आहेत, जिथे यापूर्वी कधीही मलेरिया या रोगाचा धोका दिसला नव्हता पण आता पसरत आहे. वन्य जीव विविधतेत घट झाल्यामुळे उत्तर अमेरिकेतही लाइम रोगाची प्रकरणे वाढू शकतात. नॉट्रेडेम विद्यापीठाशी निगडित संशोधकांच्या नेतृत्वाखालील अभ्यासकांनी हवामान आणि पर्यावरणावरील वाढत्या मानवी प्रभावामुळे गुंतागुंतीच्या समस्या कशा निर्माण होत आहेत, याचा सखोल अभ्यास केला आहे. अभ्यासाशी संबंधित संशोधकांनी लिहिले की, आम्हाला माहीत आहे की, संसर्गजन्य रोग वाढत आहेत आणि मानव वातावरणात व्यापक बदल करत आहेत. संसर्गजन्य रोगांचा परिणाम केवळ मानवावरच नाही, तर इतर प्राणी आणि वनस्पतींवरही होत आहे. या अभ्यासात, संशोधकांनी संसर्गजन्य रोग जागतिक बदलांना कसा प्रतिसाद देतात हे समजून घेण्यासाठी आठ वेगवेगळ्या भाषांमधील ९७२ पूर्व-अस्तित्वातील अभ्यासातून २,९३८ निरीक्षणांचे विश्लेषण केले.

या अभ्यासात वनस्पती, प्राणी आणि मानवांवर परिणाम करणारे यजमान आणि परजीवी यांचे १,४९७ संयोजन समाविष्ट होते. त्यांच्या विश्लेषणात शास्त्रज्ञांनी पाच घटकांवर लक्ष केंद्रित केले आहे, जे जगभरातील पर्यावरणात मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणत आहेत. यामध्ये जैवविविधतेचे नुकसान, हवामानबदल, रासायनिक प्रदूषण, परकीय प्रजातींचा प्रसार, नैसर्गिक अधिवासातील बदल आणि होणाऱ्या नुकसानाचा समावेश आहे. या अभ्यासात हवामान बदलामुळे वाढणारे तापमान, सरासरी तापमान आणि पावसात होणारे बदल यांचा समावेश आहे. याशिवाय नैसर्गिक अधिवासांना झालेल्या हानीमध्ये जंगलांचे तुकडे होणे, शहरीकरण आदींच्या अभ्यासानंतर शास्त्रज्ञ या निष्कर्षापर्यंत पोहोचले आहेत की, संसर्गजन्य रोग पसरण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे जैवविविधता नष्ट होणे. त्यामुळे या आजारांचा प्रसार वेगाने होत आहे. नवीन परदेशी प्रजातींचा उदय, हवामानातील बदल आणि रासायनिक प्रदूषण ही जगातील संसर्गजन्य रोगांच्या प्रसाराची सर्वात मोठी कारणे मानली जातात. संशोधनानुसार या बदलांमुळे काही रोग पसरण्याच्या अधिक शक्यता निर्माण होत आहेतच; पण त्यांच्या प्रसाराच्या पद्धतीही बदलत आहेत.

मानव आणि इतर सजीवांमध्ये संसर्गजन्य रोगांच्या वाढत्या प्रसारामुळे रोगांचा धोका वाढत आहे. याशिवाय झाडे आणि पिकांवरील रोगांचे प्रमाण वाढल्याने शेती, अन्नसुरक्षा आणि जैवविविधतेला धोका निर्माण होत आहे. या अभ्यासाशी संबंधित संशोधक जेसन रोहर यांनी म्हटले आहे की, पर्यावरणात झालेल्या अनेक बदलांमुळे प्राणी आणि मानवांमध्ये परजीवी वाढतात. याचा अर्थ असा की, या बदलांमुळे प्राण्यांपासून मानवांमध्ये अधिक रोग पसरू शकतात. तसेच या कारणांमुळे साथीचा धोका वाढू शकतो. शास्त्रज्ञांनी संशोधनात म्हटले आहे की, भविष्यात रोगांचे परिणाम अधिक व्यापक होतील. त्यामुळे वाढते उत्सर्जन कमी करण्याची तातडीची गरज अधोरेखित होत आहे. संशोधकांच्या म्हणण्यानुसार हवामानातील बदलामुळे आणि तापमानवाढीमुळे रोग पसरवणाऱ्या जीवांसाठी अधिक अनुकूल वातावरण निर्माण होत आहे. शिवाय यामुळे त्यांचा प्रजनन कालावधीही वाढत आहे. अशा परिस्थितीत या परजीवींच्या वाढीमुळे रोगांचा प्रसार होण्याचा धोकाही वाढत आहे. त्याचप्रमाणे रासायनिक प्रदूषणामुळे जीवांच्या रोगप्रतिकारक शक्तीवर दबाव येतो.

हवामानबदल प्राण्यांच्या हालचाली आणि निवासस्थानात बदल करू शकतो आणि त्यांच्या नवीन प्रजाती समोर आणू शकतो. हे रोगजनकांच्या प्रसारासाठी उपयुक्त ठरू शकतात. तथापि, मानव पृथ्वीवर घडवून आणत असलेले बदल केवळ संसर्गजन्य रोग वाढवत नाहीत, तर कमीदेखील करू शकतात. या अभ्यासातून समोर आलेली सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे नैसर्गिक अधिवास नष्ट होणे किंवा त्यांच्यात होणारे बदल संसर्गजन्य रोगांचा धोका कमी करू शकतात. तथापि, जंगलतोडीमुळे रोगराई वाढू शकते, ही कल्पनाही या अभ्यासातून नाकारलेली नाही. तथापि, त्याऐवजी काही परिस्थितींमध्ये धोका वाढू शकतो आणि इतरांमध्ये अधिवास आणि जंगलाचा नाश झाल्यामुळे धोका कमी होऊ शकतो.

जंगलांचा नाश मलेरियापासून इबोलापर्यंतच्या रोगांचा धोका वाढवू शकतो. या नवीन अभ्यासानुसार शहरीकरण होत आहे, तसतसे स्वच्छता, पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थाही सुधारत आहे. त्यामुळे संसर्गजन्य रोगांचे प्रमाण कमी होत आहे. अशा परिस्थितीत, जागतिक बदल परतवणे त्यांचे वाढणारे दुष्परिणाम दूर करण्यासाठी पुरेसे ठरेल का, हा मोठा प्रश्न आहे. संसर्गजन्य रोगांचे व्यवस्थापन करण्यासाठी मर्यादित संसाधनांसह जागतिक बदलांवर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. संशोधकांनी याला सामोरे जाण्याचे मार्ग ठळक केले. उत्सर्जन कमी करणे, परिसंस्थेचे संरक्षण करणे आणि जैविक आक्रमणांना प्रतिबंध करणे या उपायांमुळे जैवविविधतेचे नुकसान कमी होऊन वनस्पती, प्राणी आणि मानवांमधील रोगांचे ओझे कमी होण्यास मदत होऊ शकते. चांगल्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची सांगड घालणे आणखी प्रभावी ठरू शकते. मानवी क्रियाकलापांमुळे वाढते प्रदूषण, हवामान बदलामुळे जैवविविधता आणि पर्यावरणाची हानी, परकीय प्रजातींचे आक्रमण आणि अधिवासांचे नुकसान यामुळे अनेक संसर्गजन्य रोग वेगाने पसरत आहेत. हे रोग मानवांसाठीच नाही, तर इतर प्राणी आणि वनस्पतींसाठीही धोकादायक आहेत.

हवामानबदलामुळे वाढते तापमान, सरासरी तापमान आणि पावसाच्या पद्धतीत होणारे बदल यांचाही या अभ्यासात समावेश होता. पर्यावरणात झालेल्या अनेक बदलांमुळे प्राणी आणि मानवांमध्ये परजीवी वाढतात. याचा अर्थ असा की, या बदलांमुळे प्राण्यांपासून मानवांमध्ये अधिक रोग पसरू शकतात. तसेच या कारणांमुळे साथीचा धोका वाढू शकतो. या पार्श्वभूमीवर पाणी डोक्यावरून जाण्यापूर्वी आपण सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. भारतातही हवामानातील बदल, विशेषत: तापमान आणि आर्द्रतेतील बदल, काही भागात अतिवृष्टी आणि काही भागांत दुष्काळामुळे संसर्गजन्य रोगांचा प्रसार वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. भारतातील अनेक भागांमध्ये एच२ एन ३, एडेनोव्हायरस आणि स्वाइन फ्लूसह श्वसन संक्रमणांमध्ये अलीकडे वाढ झाल्याने चिंता वाढली आहे; मात्र या सगळ्यांसाठी हवामान बदलाला जबाबदार धरणे घाईचे होईल.

वातावरणातील बदलामुळे डेंगी, चिकुनगुनिया, मलेरिया या आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. सतत वाढत जाणारे तापमान विषाणूंच्या प्रसाराच्या पद्धतीवर परिणाम करतात आणि रोग पसरवणाऱ्यांवरही अनेक प्रकारे परिणाम करते. बदलती हवामान परिस्थिती विषाणूंच्या क्षमतेला आणि त्यांच्यामुळे पसरणाऱ्या रोगांना अधिक अनुकूल बनवते. उबदार आणि दमट परिस्थिती रोग पसरवण्याचे मार्ग, रोगाची वारंवारता आणि तीव्रता या दोन्हींवर परिणाम करू शकतात. हवामानातील बदलांमुळे प्रजातींच्या निवासस्थानात बदल होतो. काही प्रजाती नवीन विषाणूंना अधिक संवेदनक्षम बनवू शकतात. त्यामुळे त्यांची लोकांमध्ये पसरण्याची क्षमता वाढू शकते. उदाहरणार्थ, देशाच्या कोरड्या भागात अतिवृष्टी आणि पूर यामुळे रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. सामान्यत: हे ओल्या भागात होत असते. यामुळे कॉलरा आणि आमांश यांसारखे जलजन्य रोग तसेच मलेरिया, डेंगी आणि चिकनगुनियासारखे रोग वाढतात, असा या संशोधकांचा निष्कर्ष आहे.

**मिलिंद बेंडाळे,** पर्यावरण अभ्यासक

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# सत्तेनंतरची स्थितंतरे



केवळ जनतेला गृहीत धरून निवडणूक जिंकता येत नाहीत. पक्षाकडे जनतेच्या विकासाचे मुद्दे नसतील तर जनता केवळ भावना आणि धार्मिकतेच्या गाजराला भुलणारी नाही. हे या निवडणुकीत जनतेने सिद्ध केले आणि म्हणूनच नरेंद्र मोदी “चारसो पार’ जावू शकले नाहीत. दुसरे असे की इंडिया नामक आघाडीच्या आणि विशेषतः काँग्रेसच्या चेहऱ्यावर आज जी चमक दिसते ती त्यांच्या कर्तृत्वाची देण नाही. मोदीची हुकूम शाही आणि जनतेची स्वप्रतीची जागृती त्याला कारण आहे. इंडिया नामक आघाडीने संविधान आणि जातीधारित जनगणना हे मुद्दे प्रचारात घेतले. हे खरे मात्र काँग्रेस ला नेमका आत्ताच पुळका का आला ? असाही लोकांनी सवाल केला. त्यामुळे असे म्हणता येईल की जनताच स्वबळावर या निवडणुकीत उतरली होती. ही लढायी संविधान समर्थक आणि मनुस्मृती समर्थकांमधली वैचारिक लढायी होती. याचा फायदा काँग्रेस आणि काही प्रांतीय पक्षांना झाला जे भाजप विरोधी भूमिका घेत होते. ही निवडणूक जिंकण्यासाठी नरेंद्र मोदीने ज्या काही क्लुप्त्या आणि वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला तो किती क्रूर होता आणि कुठे कुठे किती पोरकट होता, हे जनता उघड्या डोळ्याने बघत होती. त्यामुळे असेही म्हणता येईल की भाजपने स्वतः भाजपला रोखले. आता त्यामुळेच भाजपला “खून के आंसू’ रडावे लागत आहे. स्पष्ट बहुमत नसल्यामुळे भाजपच्या गोटात स्मशान शांतता आहे. त्यांच्या अनेक स्वप्नांचा चुराडा झाला. या निवडणुकीत लोकांनी भाजपचा माज उतरवला, एवढे खरे!

लोकशाही व्यवस्थेत सरकारचा कोणताही एक धर्म नसतो किंवा कोणत्याही एका धर्माची सत्ता नसते. भारतासारख्या विविध धर्म असणाऱ्या देशात तर ते शक्यच नाही. कारण अशी राजवट हुकूमशाहीला जन्म देणारी ठरते. भाजपचे सरकारचे नेमके हेच राष्ट्रीय मुद्दे होते . हिंदु राष्ट्र निर्माण करण्याची घोषणा ही देशाला अराजकतेकडे घेऊन जाणारी होती तरी भाजपचा हा आग्रह आणि अयोध्येत बांधलेल्या मंदिरात सरकारचा हस्तक्षेप एकाधिकारशाहीला जन्म देणारा ठरला. नवीन संसद भवनाची निर्मिती करताना कोणालाही विश्वासात आणि सोबत न घेता नरेंद्र मोदीने आपण किती क्रूर हुकूमशाह आहोत, याची झलक दाखवली. उद्घाटन वेळी साधूंसोबत नरेंद्र मोदीने केलेल्या नंगानाचामुळे आणि सोबत घेतलेल्या संघाच्या संघप्रमुखामुळे भारताची जगात नाचक्की झाली. या कृतीचा जनतेने निषेध तर केलाच उलट प्रश्न सुद्धा केला की या वास्तुचे उद्घाटन तुम्ही नंगे साधू आणि भगवतांना घेऊन का करीत आहात? देशाची प्रथम नागरिक आणि संविधानिक उच्च पदस्थ व्यक्तीला सोबत का घेतले नाही? परंतु डोक्यात हवा गेलेल्या प्रधानमंत्र्याने कोणाचेही ऐकले नाही. शिक्षण, आरोग्य, रोजगार, पेट्रोल, गॅस, महागाई असे प्रश्न असताना आणि ते सोडविण्याची आपली जबाबदारी असताना “आपल्यात देवाचा अंश आहे’ या भ्रमात आणि सत्तेच्या माजात त्यांनी जनतेच्या भावनेचा चुराडा तर केलाच त्याच बरोबर त्यांचे मूलभूत अधिकार पायदळी तुडवलेत. शेवटी तेच झाले, लोकशाहीत जनता सर्वोच्च असते हे एकदा परत सिद्ध झाले. या निवडणुकीत जनतेने नरेंद्र मोदी यांना त्यांची जागा दाखवली. आज मोदीने सत्ता स्थापन केली असली तरी विरोधी पक्ष मजबूत असल्यामुळे भाजप आणि संघाचे मनसुबे मात्र धुळीस मिळाले एवढे मात्र निश्चित!

या निवडणुकीत संविधान केंद्र बिंदू राहिले. याचा फटका भाजपला बसला. या मुद्द्यानेच “भाजपच्या चारसो पार’ ला रोखले. भलेही हा मुद्दा बामसेफ आणि इतर संघटनांनी पाच-सहा वर्षापासून सामान्य नागरिकांपर्यंत पोहचला असला तरी काँग्रेसने या मुद्दाला आपला निवडूणुकीचा मुख्य अजेंडा बनवला. रोजगाराचा प्रश्न, ओबीसीचा जातीआधारित जनगणना, कृषी विषयक प्रश्न काँग्रेसने प्रचाराच्या ऐरणीवर घेतले. काँग्रेसच्या अजेंड्यावर पूर्वी कधीच संविधान हा विषय नव्हता. सामान्य लोकांच्या मूलभूत अधिकाराचे या पक्षाला काहीही देणे घेणे नव्हते. यांच्याच काळात, जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण आले, यांनीच ओबीसीची जाती आधारित जनगणना केली नाही. आरक्षण आर्थिक निकषावर देण्यात यावे अशी भूमिका घेतली.तरीही या पक्षाला हे प्रश्न का महत्वाचे वाटलेत ? म्हणतात ना ‘मरता क्या नही करता’ या निवडणुकीत ही अपरिहार्यता होती. त्यांचे आजचे संविधान विषयक प्रेम हे केवळ मगरीचे अश्रू आहेत.हे लोकांनंही समजले असले तरी लोकांना दुसरा पर्याय नसल्यामुळे दगडापेक्षा विट मऊ म्हणून काँग्रेस डोक्यावर मारून घ्यायची होती ती त्यांनी या निवडणुकीत मारली. एरवी काँग्रेसचे काँग्रेस जिंकून आणण्यात फारसे योगदान नाही. खुद्द भाजपने हे मान्य केले आहे की काँग्रेसने संविधान धोक्यात आहे, असा जो प्रचार केला त्याला थोपवण्यात आमच्याकडे वेळ नव्हता, त्याविषयी कार्यक्रम नव्हता.

राजकारण हे जसे जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर जिंकता येते तसेच ते सामाजिक सूत्राबरोबर सांस्कृतिक प्रभाव निर्माण करून सुद्धा जिंकता येते. ही बाब ज्यांना समजली आणि त्याने अमलात आणली तो पक्ष यशस्वी ठरतो. भारतात सुरवातपासून नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे हनन झाले आहे. कोणत्याच सरकारचा मूलभूत अधिकार देण्याबाबत किंवा जातीवाद संपवण्यासाठी प्रयत्न झाला नाही. उलट तो कसा कायम राहील, वाढेल यासाठी त्यांनी आपली शक्ती खर्ची घातली आहे. असा प्रयत्न झाला असता तर जातीय हिंसाचार, महिलांवरील अत्याचार रोखले गेले असते आणि मोदीलाही ९० करोड लोकांना ५ किलो धन्य देण्याची वेळ आली नसती. ही बाब स्वतःला महाशक्तिशाली देश म्हणवून घेणाऱ्या भारताला भूषणवह नाही. ५ किलो धन्य देत असताना भाजपच्या अन्य संस्था संस्कृतिक प्रभाव निर्माण करण्यास कुठेही कसर करीत नाहीत. या माध्यमातून समाजमनावर ते आपली राजकीय पकड मजबूत करतात. आदिवासी बहुल भागात वनवासी आश्रमचे कार्य सेवभावाने केले जात असल्याचे सांगीतले जात असले तरी त्यामधून ते आपले राजकीय प्राबल्य वाढवतात हे मात्र खरे. त्यातूनच त्यांच्या सत्तेचा मार्ग मोकळा होतो. याचा अर्थ त्यांच्या राजकारणावर सांस्कृतिक प्रभाव आहे, हे कोणीही नाकारू शकणार नाही.

स्थिर सरकार हुकूमशाहीला जन्म देते तर अस्थिर सरकार सुदृढ लोकशाहीसाठी पोषक असते.याचा अर्थ लोकशाहीत कोणीही एकाधिकारशाहीचा विचार करू नये. ज्यांनी तसा प्रयत्न केला तर त्याचा नरेंद्र मोदी होतो नाहीतर मायावती, नवीन पटनायक होतो. ९० च्या दशकानंतर भारताच्या राजकारणावर मंडल आयोगावर थोडाफार प्रभाव जाणवायला लागला. बहुजनांनामध्ये पक्षीय नेतृत्व निर्माण झाले.

प्रांतीय पक्षामुळे राष्ट्रीय स्तरावर एक वचक निर्माण झाला. देशांत अनुसूचित जाती, जमाती, धार्मिक अल्पसंख्यांक जनतेचा जसा राजकारणासंदर्भात सकारात्मक दुष्टीकोन तयार झाला तसेच त्यांच्यात जगण्याचे बळ निर्माण झाले. पुढे काही वर्षात नेत्यांच्या स्वार्थापोटी वेगवेगळे गट पडले. हे प्रांतीय नेते केंद्रात ज्याचे सरकार त्याची हुजरेगिरी करू लागले. म्हणुनच आपण बघतो की एनडीए आणि इंडिया आघाडीत कुठेतरी वडचणीला आपले काही नेते उभे राहतांना दिसतात.

या निवडणुकीत काँग्रेसने प्रांतीय पक्षांना सोबत घेऊन आपली बाजू भक्कम केली. म्हणूच तीने या निवडणुकीत शंभरी गाठली. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्या पक्षांसोबत तसेच उत्तरप्रदेशत समाजवादी पक्षासोबत केलेल्या युतीमुळे काँग्रेसच्या जागा वाढल्या. थोडक्यात काँग्रेसला प्रांतीय पक्षांनी केवळ ऑक्सिजनच दिले नाही तर उठून उभे सुद्धा केले. या निवडणुकीत ४०० पार चा दावा करणाऱ्या भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. शेवटी त्यांना बिहारचे नितीशकुमार यादव आणि आंध्रप्रदेशच्या चंद्राबाबू नायडूच्या कुबड्या घेऊन सरकार स्थापन करावे लागले. या अठराव्या लोकसभेला मजबूत विरोधी पक्ष मिळाल्यामुळे लोकशाहीसाठी हे चांगले संकेत आहेत, असे म्हणावे लागेल.

लोकशाहीत विरोधी पक्षाची भूमिका महत्वाची असते किंवा असेही म्हणता येईल की विरोधी पक्षाशिवाय लोकशाहीची कल्पनाच केली जावू शकत नाही.नाहीतर ती एकाधिकारशाही किंवा हुकूमशाही ठरते. भारताच्या लोकशाहीला अपेक्षित असलेला विरोधी पक्ष मिळाला नाही. भाजप आणि काँग्रेस हे दोन पक्ष एकाच विचारधारेचे असल्यामुळे यापैकी कोणीही आपली विरोधी पक्ष म्हणून भूमिका बजावली नाही. १८ व्या लोकसभेत आपण इंडिया नामक आघाडीला आणि त्यातही काँग्रेसला विरोधी पक्ष म्हणून स्वीकारले आहे. दुसऱ्या बाजूला चंद्राबाबू नायडू आणि नितीशकुमार सत्तेत असल्यामुळे लोकशाहीप्रमाणे कारभार चालेल अशी अशा लोकांना आहे. परंतु दहा वर्षात भाजपने जी घाण करून ठेवली ती निस्तारायची कशी? हा प्रश्न आहे.

**जीवन गावंडे, ७३५०४४२९२०**

# मानवतावादी विचार आत्मसात करण्याचा संकल्प घ्या-सावन कटरे

**गोंदिया :-** तथागत बुद्धाने आत्मा, ईश्वर, स्वर्ग, आदि नाकारले आहे, त्यांनी समताधिष्टीत समाज व्यवस्था निर्माण करण्याची शिकवण दिली. तेव्हा बुद्ध तत्वज्ञानावर आधारित मानवतावादी विचारांचा समाज निर्माण करण्याचा संकल्प घ्या असे आवाहन ओबीसी चळवळीचे नेते सावन कटरे यांनी (ता. ९) केले.




येथील बुद्धिस्ट समाज संघ प्रणित संथागारात आयोजित ओ बी सी चळवळीचे प्रणेते दिवंगत पेमेंद्र चव्हाण सर यांच्या श्रद्धांजली कार्यक्रमात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.मंचावर सामाजिक कार्यकर्ते उमेश कोराम, श्रीमती माधुरी पेमेंद्र चव्हाण, सेवानिवृत्त तलाठी मुकेश मेश्राम उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्त्या आयुष्मती अल्का सुनील भरणे यांनी केले होते.

पुढे बोलताना श्री कटरे आणि श्री कोराम यांनी पेमेंद्र सरांच्या जीवनावर प्रकाश टाकला. याप्रसंगी श्रीमती माधुरी पेमेंद्र चव्हाण यांना स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन त्यांचं सांत्वन करण्यात आले. दरम्यान श्रीमती अल्का भरणे यांच्यावतीने भोजन दान देण्यात आले. त्यानंतर इंजि. अरविंद माळी यांच्या कॅडर कॅम्पचे आयोजन करून बुद्ध फुले आंबेडकरी विचारातून समाज घडविण्याची प्रेरणा देण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन गौतम गजभिये यांनी करून, माझेही भले हो तुमचेही कल्याण हो या संकल्प प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

ओबीसी समाजात जन्मलेले आणि पेशाने शिक्षक असलेले पेमेंद्र चव्हाण यांचे बुधवारी ३ जून रोजी नागपूरच्या एका इस्पितळात अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचं हृदय हे फुले आंबेडकरी विचाराने अथांग भरले होते. याचं तत्वज्ञानावर आधारित त्यांनी ओबीसी चळवळ उभी केली होती. त्यांनी सामाजिक काम करताना कश्याचीही भिती बाळगली नाही. “डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुण्याईने मला नौकरी मिळाली,फुले-आंबेडकरी चळवळीचे काम करतांना नौकरी गेली तरी चालेल” अशी त्यांची विचारसरणी होती. त्यांच्या निधनानंन्तर पारंपरिक धार्मिक संस्कारांना तिलांजली देऊन त्यांच्या कुटुंबाने १३ दिवसांच्या तेरवी ऐवजी ३ दिवसात श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित केला होता. हा कार्यक्रम पोवार बोर्डिंग येथे पार पडला. यावेळी सत्यनारायण पूजा न करता यां कार्यक्रमाऐवजी जइउ बांधव गुरूदास येडेवार यांनी ग्रामगितेचे वाचन केले. यावेळी उपस्थित वक्त्यांनी श्रद्धांजली वाहताना महापुरुषांचे विचार मांडले. मृताच्या आत्म्याला शांती प्रदान करणेसाठी मुंडण करणे ही निव्वळ अंधश्रद्धा समजून कोणताही कर्मकांड, केशवपण (मुंडण) करण्यात आलेला नाही, हे विशेष.

# सात जिल्हा परिषद क्षेत्राला मिळाले जलरथ




**अर्जुनी मोरगाव:-** तालुक्यातील काही भागाला पाणी टंचाईच्या झळा बसत आहेत. खाजगी, सार्वजनिक कार्यक्रमांत नागरिकांना पिण्याचे पाणी सहज मिळावे म्हणून गोंदिया जिल्हा परिषदेने १५ व्या वित्त आयोग जिल्हास्तर निधी अंतर्गत तालुक्यातील सात जिल्हा परिषद क्षेत्राला जलरथ उपलब्ध करून दिले.

गोंदिया जिल्हा परिषदेने जिल्हा निधी अंतर्गत प्रत्येक जिप सदस्याला वैयक्तिकरित्या प्रत्येकी १० लाखाचा निधी देण्याचे ठरविले होत. त्यानुसार काही जिप सदस्यांनी पिण्याचे पाण्याची गरज लक्षात घेता जलरथ घेण्याचे नियोजित केले. उर्वरीत निधीतून क्षेत्रात विकास कामे हाती घेतले आहेत. तालुक्यात सात जिल्हा परिषद क्षेत्राला प्रत्येकी एक जलरथ प्राप्त झाले आहे. नवेगावबांधच्या जि. प. सदस्या रचना गहाणे यांनी नवेगावबांध ग्रामपंचायत, गोठणगावचे जिप सदस्य यशवंत गणवीर यांनी गोठणगाव, बोंडगावदेवीचे जिप सदस्य लायकराम भेंडारकर यांनी पिंपळगाव, माहुरकुडाच्या जिप सदस्या कविता कापगतेंनी माहुरकुडा, केशोरीचे जिप सदस्य श्रीकांत घाटबांधेंनी केशोरी, महागावच्या जिप सदस्या जयश्री देशमुख यांनी महागांव व ईटखेडाच्या जिप सदस्या पोर्णिमा ढेंगे यांनी इसापुर ग्रामपंचायतच्या सुपूर्द जलरथ केले.

उर्वरीत निधीतून या ग्राम पंचायतींना लवकरच टॅक्टर उपलब्ध करून देणार असल्याचे जिप सदस्य तथा गटनेते लायकराम भेंडारकर यांनी सांगितले. या जलरथाचा जिप क्षेत्रातील सर्वच गावातील नागरिक लाभ घेवू शकतील. सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक कार्यक्रमासाठीही जलरथाचा उपयोग करू शकतात. जलरथ नेआण करण्याची जबाबदारी लाभार्थ्यांची राहील. देखभाल दुरुस्ती ग्रामपंचायत करेल. जिप सदस्यांचा निर्णय कौतुकास्पद असून जलरथामुळे पिण्याच्या पाण्याची समस्येचे निवारण होणार आहे. पिंपळगाव येथे जलरथ लोकार्पण कार्यक्रमाला जिप सदस्य लायकराम भेंडारकर, सरपंच विलास फुंडे, उपसरपंच निवृत्ता शेंडे, गौरीशंकर ब्राम्हणकर, प्रज्ञा डोंगरे, ग्रामसेवीका कावळे, दादाजी ब्राम्हणकर, प्रेम अग्रवाल तर इसापुर येथ्इील कार्यक्रमाला जिप सदस्या पोर्णिमा ढेंगे, माजी जिप सभापती उमाकांत ढेंगे, सरपंच सरस्वता वलथरे, सर्व्हेश धांडे उपस्थित होते.

# केवायसी अभावी ४८८१ शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचीत

**गोंदिया :** नैसर्गिक आपत्तीत पीक, जनावरे, मालमत्तेचे नुकसान झालेल्या पात्र शेतकऱ्यांना आर्थिक मदत शासनाच्यावतीने थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. मात्र, जिल्ह्यातील ४ हजार ८८१ शेतकऱ्यांची ई-केवायसी झाली नसल्याने त्यांच्यावर मदतीपासून वंचीत राहण्याची वेळ आली आहे.

जिल्ह्यात खरीप हंगामात अतिवृष्टी, अवकाळी पाऊस यामुळे घरे, गुरे, साहित्य व पिकांचे नुकसान झाले. प्रत्यक्ष पंचनाम्याअंती नुकसान भरपाईस पात्र शेतकऱ्यांच्या याद्या प्रमाणित करून संबंधित तहसीलदारांमार्फत संगणकीय प्रणालीवर अपलोड केले जात आहे. अपलोड करण्यात आलेल्या यादीची शासनस्तरावरून पडताळणी होऊन माहितीच्या आधारे लाभार्थ्यांचे नाव, बाधित क्षेत्र, मदतीची रक्कम आदी तपशील दर्शविणारी विशिष्ट क्रमांक यादी संगणकीय प्रणालीद्वारे तयार आहे. जून २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीत शेतपिकांचे व शेतजमिनीचे नुकसान झालेल्या पात्र शेतकऱ्यांची यादी पोर्टलवर अपलोड करून देण्यात आली. यानुसार पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रक्कम थेट जामा करण्यात आली. मात्र, अजूनही जिल्ह्यातील ४ हजार ८८१ शेतकऱ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया केली नसल्याले या शेतकऱ्यांची रक्कम बँक खात्यात जमा झाली नाही.

जिल्ह्यात अतिवृष्टी, अवकाळी पाऊस यामुळे २५ हजार हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले होते. याचा जिल्ह्यातील ४२ हजार शेतकऱ्यांना फटका बसला. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाईसाठी ६७ कोटी रुपयांचा निधी शासनाने जिल्हा प्रशासनाकडे पाठविला होता. ज्या शेतकऱ्यांनी केवायसीची प्रक्रिया पूर्ण केली त्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रक्कम जमा झाली. तर ४८८१ शेतकऱ्यांची केवायसीची प्रक्रिया झाली नसल्यामुळे ८ कोटी पेक्षा अधिक रक्कम जिल्हा प्रशासनाकडे पडून आहे. पात्र शेतकऱ्यांनी ई-केवायसी करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

तालुकानिहाय नुकसान भरपाईपासून वंचित असलेले शेतकऱ्यांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास सर्वाधिक गोंदिया तालुक्यात २४३९ शेतकरी, आमगाव ८२४, तिरोडा ५१७, गोरेगाव ४८७, सालेकसा २६१, अर्जुनी मोर १८६, सडक अर्जुनी ११२ व देवरी तालुक्यातील ५५ असे ४८८१ शेतकरी लाभापासून वंचीत आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेस भवनात पक्षाचा २५ वा वर्धापन दिन थाटात

**गोंदिया**-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस भवन रेलटोली, कार्यालय गोंदिया येथे ध्वजारोहण कार्यक्रम प्रदेश सचिव श्री विनोद हरिणखेडे व जिल्हाध्यक्ष श्री प्रेमकुमार रहांगडाले यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय राज्यघटनेतील उद्देशिकेचे वाचन करून साजरा करण्यात आला.

गोंदिया जिल्ह्यातील सर्वसामान्यांना खासदार प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वावर विश्वास आहे. हा पक्ष शेतकरी, शेतमजूर यांचा असून श्री पटेली यांनी नेहमी सर्वांगीण विकासाचे ध्येय ठेवून काम केले आहे. माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात पक्षाची वाढ व विस्तार करण्यासाठी बूथ स्तरावर संघटन मजबूत करावे असे मनोगत उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करतांना व्यक्त केले.

# संविधान पूजन की अंमल?



भारताचे संविधान हा भजनपूजनाचा विषय आहे का ? अजिबात नाही. सरळसरळ अंमलबजावणीचा विषय आहे. तो आस्थाश्रध्देचही विषय नाही. जीवनमरणाचा नक्की आहे. अर्थात पूजनाचा नाही. पालनाचा आहे.

तिसऱ्यांदा प्रधानमंत्री पदाची घोषणा होताच, नरेंद्र दामोदरदास मोदी यांनी, संविधान या जाडजूड पुस्तकाचे, समर्थित खासदारांपूढे ममस्तकपूजनफ केले.

संविधान हे माझ्यासाठी ‘पूज्य’ आहे असे ह्या महत्तमांना सांगायचे असेल. ते सांगणे तसे फोटोसह जगभर पाठवले गेले. इथेच थांबले नाहीत. लगेच ट्वीट केले, ‘माझ्यासारखा गरीबीतून आलेला गरीबाचा मुलगा, केवळ संविधानामुळे पंतप्रधान होऊ शकला’.

प्रधानमंत्र्यांची संविधानाप्रती ही कृतज्ञता, महिंदुत्वामुळे मी ओबीसी झालो अनब गरीब राहीलो अशा वळणाची निश्चितच नाही. ती गरीब-श्रीमंत अशा ढोबळ वळणाची आहे. या महत्तमांना असा नाद आहे. २०१९ ला सत्ता हाती येताच, संसदपूजन केले होते. संसदभवनात आल्याआल्या पायऱ्यांवर लोटांगण घातले. प्रतिकात असे ते रमत असतात.मधल्या काळात नव्या संसदभवनाचे उदघाटनात साधू व सेंगोर आणले होते. धर्मसंसदेचा आभास निर्माण केला गेला. यावेळी संविधान पुस्तकाचे ‘मथ्थापूजन’ झाले. यालाही कारणे असावीत.

यंदाच्या निवडणुकीत संविधान हा कळीचा मुद्दा होता. त्याला अनेक अंगे होती. म्हणून तो ‘मथ्था विषय’ होत नाही. या देशाने काय करावे, काय करू नये याची कटिबद्धता या संविधानात आहे. ते लोकशाही राज्यव्यवस्थेचे ‘रोडमॅप’ आहे. प्रतिक नाही. देशाला तसतसे न्यावे हे मान्यसांगणे आहे. ते संपूर्ण भारतीयांचे, भारतीयांसाठी आहे.संसदेत, देशात काय घडले ते लपून नाही. सारे उघड आहे. लोकशाही व संविधान परस्परपूरक असतात. संसदेची, संविधानाची किती प्रतिष्ठा पाळली गेली, हेही स्पष्ट दिसले. लोकशाही की पक्षशाही की एकशाही हेही दिसलेय!

राजकीय सत्ता प्राप्त करण्यास हिंदुत्व, धर्मत्व, बहुसंख्यकत्व, देवत्व, सनातनत्व, प्रतिकत्व, द्वेषत्व, आक्रमकत्व या संज्ञा अधू ठरल्यात. यंदाच्या लोकसभा निकालाने, माणसे ही केवळ मत देण्यासाठी नसतात. मताधिकारी असतात. ‘जो रोजी रोटी की बात करेगा वो लोगोंपर राज करेगा’ या संज्ञेला त्यांनीच मुख्य अजेंड्यावर आणायला बाध्य केले.

यापूढे आम्हाला ‘धर्मगृहित धरु नका’ असा स्पष्ट इशारा दिला. आधी आमच्या जगण्याचा आधी विचार करा असा जणू आदेशच दिला. ‘माणसाचे जगणे महत्वाचे’ याला महत्त्व आणले. धर्मवस्त्र चढवून जगण्याचे वस्त्रहरण होणे बहुसंख्य भारतीयांना पटले नाही. त्यांनी ताकदीने हे सांगायला, त्यांना मिळालेला नकाराधिकार (veto power) वापरला. अर्थात, आज मापात आणले, उद्या कोमात टाकू शकतील !

**रणजित मेश्राम, नागपूर**

# सुर्याटोला बांध तलाव पुन्हा अतिक्रमणाच्या विळख्यात

## तलावाचे जमिनीत रूपांतरणाचा डाव, जिल्हाधिकाऱ्यांसह वरिष्ठांना तक्रार

**गोंदिया :** शहरातील शासकीय जमिनीवर डोळा ठेवून अतिक्रमण करण्याचा सपाटा सुरू आहे. याला प्रशासनाचा नाकर्तेपणा आणि कारवाईचा अभाव कारणीभूत आहे. परिणामी अतिक्रमणकर्त्यांकडून शहरातील शासकीय जमिनी गिळंकृत केल्या जात आहेत. असाच प्रकार सुर्याटोला येथे सुरू आहे. येथील प्रसिध्द असलेला बांध तलाव पुन्हा अतिक्रमणाच्या विळख्यात सापडला आहे. अतिक्रमणकर्त्यांनी तलाव खोदून जमिनीत रूपांतर करण्याचा डाव आखून पाऊल टाकले आहे. हा प्रकार सुरू असूनही प्रशासन आणि स्थानिक जनप्रतिनिधी डोळेझाक करीत आहे. त्यामुळे बांध तलावाचे अस्तित्व धोक्यात आले असून कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांना तक्रार

**सुर्याटोला येथील गट क्र.३३०/०१ मध्ये बांध तलाव आहे. सदर तलाव आदर्श मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था सुर्याटोला ला मासेमारीकरीता ठेक्याने लीजवर देण्यात आले आहे. सदर संस्था तलावावर मत्स्यबिज संचयन करुन मत्स्यपालन व मत्स्य व्यवसाय करीत आहे. परंतु येथील रहिवासी देवाजी मानीकराव तुपकर व हरिराम बारबुध्दे यांनी तलावाच्या मधोमध जेसीबीच्या माध्यमातून सपाटीकरण करून शेती करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. अतिक्रमणाच्या या प्रकाराने तलाव धोक्यात आले आहे. या संदर्भात त्यांना हटकले असता संस्थेच्या सभासदांना धमकी देत असून वाद निर्माण करीत आहेत. त्यामुळे संस्थेचे आर्थीक नुकसान होऊन शासकीय मालमत्ता धोक्यात आली आहे. आदर्श मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्थेच्या वतीने याची तक्रार जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधिक्षक, मुख्य कार्यपालन अधिकारी, पोलिस निरीक्षक तथा पं.स.च्या गट विकास अधिकाऱ्यासह संबधित विभागाच्या वरिष्ठांना करण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या भुमिकेकडे लक्ष लागले आहे.**

शहरातील सुर्याटोला परिसरातील बांध तलाव नेहमीच अतिक्रमणकर्त्यांच्या रडारावर राहिला आहे. तलाव परिसरात यापुर्वीही अतिक्रमण करण्यात आले होते. परंतु, स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेवून प्रशासनाला कारवाई करण्यास बाध्य केले. येथील रहिवासी असलेले सुर्यवंशी गुरूजी यांनी अतिक्रमणाला घेवून आंदोलन केले होते. त्यांच्या आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने अतिक्रमण काढून बांध तलावाचे सौंदर्यीकरण केले होते. यामुळे बांध तलावाचे संरक्षण होऊन परिसराच्या सौंदर्यात भर पडली. तसेच बांध तलाव नागरिकांसाठी फेरफटका मारण्याचे ठिकाण म्हणून प्रसिध्द झाले. तलावामुळे परिसरातील पाणी पातळी टिकून राहण्यास मदत झाली. परंतु, पुन्हा बांध तलावाला ग्रहण लावण्याचे काम सुरू झाले आहे.

येथील रहिवासी असलेले देवाजी मानिकराव तुपकर व हरीराम बारबुध्दे यांनी बांध तलावावर अतिक्रमण करणे सुरू केले. तलावात जेसीबीच्या माध्यमातून खोदकाम करून तलावाचे पात्र सपाटीकरण केले जात आहे. यातून तलाव समतल होऊन जमिनीत रूपांतर करण्याचा अतिक्रमणकर्त्यांचा डाव आहे. शिवाय या जमिनीवर शेती करण्याच्या उद्देशाने हालचाली सुरू आहेत. त्यामुळे बांध तलावाचे अस्तित्व पुन्हा धोक्यात आले आहे.



### प्रशासन लक्ष देणार का?

**सुर्याटोला येथील बांध तलावावर नेहमीच अतिक्रमणकर्त्यांचा डोळा राहिला आहे. प्रशासनाकडून योग्य कारवाई होत नसल्याने अधूनमधून अतिक्रमणाचे प्रकार सुरूच राहतात. आता पुन्हा तलावात अतिक्रमण करून तलाव सपाटीकरणाचे काम सुरू आहे. प्रशासनाने वेळीच लक्ष दिले नाही तर बांध तलावही सुर्याटोला वासीयांच्या आठवणीपुरतेच शिल्लक राहणार? असेच अतिक्रमण कर्त्यांच्या हालचालीवरुन दिसत आहे. याची तक्रार जिल्हाधिकारी यांच्यासह सर्वच वरिष्ठांना करण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासन कोणती कारवाई करणार, याकडे लक्ष लागले आहे.**

जिल्हा प्रशासनाने लाखो रूपये खर्च करून या तलावाचे सौंदर्यीकरण केले होते. परंतु, अतिक्रमणकर्त्यांनी तलावावर डोळा ठेवून अतिक्रमणासाठी हालचाली गतिमान केल्याने तलाव नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. या गंभीर प्रकाराकडे वेळीच लक्ष देवून त्या अतिक्रमणकर्त्यांवर कारवाई करावी, अशी मागणी सुर्याटोला येथील नागरिकांकडून केली जात आहे. विशेष म्हणजे, यापुर्वीही अतिक्रमणाच्या समस्येला घेवून सुर्याटोला येथील रहिवासी सुर्यवंशी गुरूजी यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. त्यावेळी जिल्हा प्रशासनाने अतिक्रमणकर्त्यांवर कारवाई करून बांध तलावाला संरक्षण दिले होते.

# मोहाडी पंचायत समितीतील घोटाळ्याची चौकशी सुरू

## प्रकरण अमृत महोत्सव निधीचे

**मोहाडी :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी उशिरा आलेला पाच लाख रुपयांचा निधी त्या कार्यक्रमासाठी खर्च न करता खोटे बिल सादर करून भलत्याच कामाकरिता खर्च करण्यात आला होता. याची तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्यांना करण्यात आली होती. या तक्रारीची प्राथमिक चौकशी १६ मे रोजी आणि अंतिम चौकशी २८ मे रोजी मुख्य लेखा व वित्त अधिकारी संतोष सोनी तसेच सहाय्यक वित्त लेखा अधिकारी अश्विन वाहने, तसेच तिडके यांच्या चौकशी समितीने मोहाडी पंचायत समितीत येऊन सुरू केली असल्याने पंचायत समिती प्रशासनात खळबळ उडाली आहे. दोषी अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई होईल की नाही यावर वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

### निधीचा कार्यालयीन उपयोगाकरिता खर्च

**स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी मिळालेल्या निधीतून विज साहित्य, नळ दुरुस्ती २३ हजार ५३५ रुपये, कार्यालय विद्युत बिल ३९ हजार ११० रुपये, सभा खर्च २२ हजार ८४५ रुपये, स्टेशनरी ९४ हजार २६७ रुपये, संगणक दुरुस्ती ४४ हजार २३० रुपये, नवीन संगणक खरेदी ७५ हजार रुपये, कुलर खरेदी ४७ हजार २१५ रुपये, सहायक गटविकास अधिकारी कक्षाची दुरुस्ती व रंगरंगोटी ४६ हजार ६४५ रुपये, वृत्तपत्र देयक, कार्यालय स्वच्छता १० हजार ५०० रुपये यासह इतर खर्च दाखविण्यात आले आहेत. विशेषत: हा खर्च जिल्हा निधी किंवा आकस्मिक निधी यांच्यातून नेहमी करण्यात येत असतो. मग त्या जिल्हा निधीचे काय झाले असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव २०२२-२३ मध्ये साजरा करण्याकरिता पंचायत समिती कार्यालयातील कर्मचारी व शिक्षकांकडून लाखाच्या वर लोकवर्गणी करून हा कार्यक्रम साजरा करण्यात आला होता. त्यानंतर काही दिवसांनी शासनाकडून हा कार्यक्रम साजरा करण्यासाठी मोहाडी पंचायत समितीला पाच लाख रुपयांचा निधी देण्यात आला होता.

परंतु, हा कार्यक्रम पूर्वीच साजरा झाला असल्यामुळे हा निधी शासनाला परत करणे आवश्यक होते. परंतु, तसे न करता हा संपूर्ण निधी हडप करण्याच्या उद्देशाने तत्कालीन गटविकास अधिकारी आणि कनिष्ठ लेखा अधिकारी या दोघांनी संगणमत करून बोगस बिले लावून संपूर्ण निधी खर्च केला. विशेष म्हणजे, निधी खर्च करण्यासाठी येथील सहाय्यक लेखा अधिकारी यांची टिप्पणी व स्वाक्षरी घेण्यात आली नाही. याची तक्रार सभापती, उपसभापती व सदस्यांनी आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी यांच्याकडे करून चौकशीची मागणी केली होती.

या तक्रारीची दखल घेत आयुक्तांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून त्यावर कोणता निर्णय घेण्यात येतो याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# माओवाद्याचे गडचिरोली पोलीस व सीआरपीएफ दलासमोर आत्मसमर्पण




**गडचिरोली:**–माओवाद्याच्या ११ प्रकरणात सहभागी व २ लाख रुपयाचा बक्षिस असलेल्या एका जहाल १० जून २०२४ रोजी गडचिरोली पोलीस व सीआरपीएफ फसमोर आत्मसमर्पण केले.त्या माओवाद्याचे नाव किशोर ऊर्फ मुकेश पेन्टा कन्नाके वय ३७ वर्षे रा. नेलगुंडा, तह. भामरागड, जि. गडचिरोली असे आहे.शासनाच्या आत्मसमर्पण योजनेमुळे आजपर्यंत एकुण ६६३ माओवाद्यांनी गडचिरोली पोलीस दलासमोर आत्मसमर्पण केले आहे.

किशोर ऊर्फ मुकेश पेन्टा कन्नाके हा २०१४ मध्ये जनमिलिशिया सदस्य म्हणून (भामरागड दलम) मध्ये भरती होवून सन २०१५ पर्यंत कार्यरत होता.२०१५ मध्ये डीएकेएमएस (दंडकारण्य आदिवासी किसान मजदूर संघटना) मध्ये अध्यक्ष पदावर पदोन्नती होवून सन २०१८ पर्यंत कार्यरत होता.२०१८ मध्ये आरपीसी (रक्षा पार्टी कमिटी/ रिवॉल्युशनरी पिपल काउंसिल) सदस्य म्हणून सन २०२२ पर्यंत कार्यरत होता.त्यानंतर २०२२ पासून भामरागड दलम सदस्य व आरपीसी (रक्षा पार्टी कमिटी/ रिवॉल्युशनरी पिपल काउंसिल) चा अध्यक्ष पदावर पदोन्नती होवून आजपावेतो कार्यरत होता. त्याच्यावर दरबा पहाडी,कोपर्शी जंगल व पेनगुंडा जंगलीतील चकमकीत प्रत्यक्ष सहभागाचे गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. सोबतच ४ खून केल्याचे व ४ जाळपोळीच्या घटनांची नोंद त्याच्या नावे आहे.

महाराष्ट्र शासनाने किशोर ऊर्फ मुकेश पेन्टा कन्नाके याचेवर ०२ लाख रूपयाचे बक्षीस जाहिर केले होते.आत्मसमर्पणानंतर पुनर्वसनाकरीता केंद्र व राज्य शासनाकडुन किशोर ऊर्फ मुकेश पेन्टा कन्नाके याला एकुण ४ लाख ५० हजार रुपये बक्षीस जाहिर केले आहे.

गडचिरोली पोलीस दलाने अतिशय प्रभावीपणे माओवादविरोधी अभियान राबविल्यामुळे तसेच शासनाने माओवाद्यांना आत्मसमर्पणाची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिल्याने, सन्मानाने जीवन जगण्यासाठी सन २०२२ ते २०२४ सालामध्ये आतापर्यंत एकुण १५ जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे.

सदर माओवाद्याचे आत्मसमर्पण घडवून मुख्यप्रवाहात आणण्याबाबतची कारवाई पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) नागपूर संदिप पाटील, पोलीस उप-महानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्रअंकित गोयल, पोलीस उप-महानिरीक्षक (अभियान) सीआरपीएफ जगदीश मीणा, पोलीस अधीक्षक गडचिरोली नीलोत्पल, कमांण्डट ३७ बटा. सिआरपीएफ एम.एच.खोब्रागडे, पोलीस अधीक्षक विशेष कृती दल नागपूर संदीप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, नक्षलविरोधी अभियान नागपूर श्रीमती. ज्योत्स्ना मसराम, सपोनि. जितेंद्र वैरागडे, पोहवा/प्रमोद पुरी सह सीआरपीएफ ३७ बटा. बी-कंपणीने पार पाडली.

# महेश दखणे हत्याकांडातील चार आरोपी जेरबंद



**गोंदिया:**–दुचाकीने जाणाऱ्या एका प्रॉपर्टी डीलरवर अज्ञातांनी हल्ला केल्याची घटना रविवार ९ जून रोजी सकाळी पावणेदहा वाजेच्या सुमारास शहरातील छोटो गोंदियातील किसान चौक येथे घडली. घटनेत गंभीर जखमी झालेल्या महेश दखने (३६, रा. छोटा गोंदिया यांचा काल रात्रीत्र ९.३० वाजताच्या सुमारास शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला. घटनेनंतर पोलसांनी तपासाची सुत्रे हलवून मुख्य आरोपीसह इतर तिन आरोपींना रविवारीच रात्री ११.३० च्या सुमारास बेड्या ठोकल्या. देवेंद्र उर्फ देवा तुकाराम कापसे (४८) रा. आंबाटोली, गोंदिया असे मुख्य आरोपीचे तर सुरेंद्र हरिदास मटाले (३२) रा. शिवणी ता. आमगाव, मोरेश्वर चैतराम मटाले (२६) रा. मोहगाव ता. आमगाव व नरेश नारायण तरोणे (३८) रा. आरटीओ ऑफिस जवळ गोंदिया असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

### देवाने दिली महेशच्या हत्येची सुपारी

**महेश व देवा हे जमिन खरेदी-विक्रीचा व्यावसाय करीत होते. देवाचे महेशकडे १६ लाख होते. वारंवार मागणी करूनही महेशकडून पैसे परत मिळाले नसल्याने देवाने महेशच्या हत्येचा कट रचला. दरम्यान नरेश तरोणेच्या माध्यमातून आरोपी सुरेंद्र व मोरेश्वर यांना हत्येची सुपारी दिल्याचे सांगीतले जाते.**

महेश दखने हे जमिन, भूखंड खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतात. ते घटनेच्या वेळी त्यांच्या दुचाकी क्रमांक एमएच ३५ एव्ही ने किसान चौक येथे गेले. यावेळी त्यांनी त्यांची दुचाकी एका दुचाकी दुरूस्तीच्या दुकानापुढे ऊभी केली.

एवढ्यातच धरून बसलेल्या आरोपी हल्लेखोरांनी महेश यांच्यावर लोखंडी हथोड्याने डोक्यावर वार केले. यात ते गंभीर जखमी झाले. हल्लेखोर घटनस्थळावरून पसार झाले. यानंतर महेश यांना डॉ. बहेकर यांच्या रुग्णालयात अतिदक्षता कक्षात दाखल करण्यात आले. रविवारी रात्री साडेनऊ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. कामिनी महेश दखणे यांच्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी गुन्हा नोंद करून विशेष पथकामार्फ्रत आरोपींचा शोध घेण्यात आला. गोपनिय माहिती व तांत्रीक विश्लेषणावरून रविवारला दुपारी देवा कापसे याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केल्यानंतर तिन आरोपींची नावे सांगीतली. आरोपींच्या शोधात पोलिस पाठवून त्यांना रविवारी रात्री ११.३० वाजता ताब्यात घेतले. याप्रकरणी भादंविच्या कलम ३०२, ३०७, ३४ अन्वये गुन्हा नोंद करून १० जून रोजी चारही आरोपींना न्यायालयात सादर केले असता १५ जूनपर्यंत न्यायालयाने चारही आरोपींना पोलिस कोठडी ठोठावली असल्याचे पोलिस उपविभागीय अधिकारी रोहिणी बानकर यांनी शहर पोलिस ठाणे येथे आयोजित पत्र परिषदेत सांगितले.




# बचतगटाच्या नावावर अवैध सावकारी

## ग्रामीण भागातील वास्तव; प्रशासनाने करावी कारवाई

**तिरोडा :** बचतगटाच्या माध्यमातून महिलांनी स्वयंरोजगार करून आर्थिक उन्नती साधावी, म्हणून शासन प्रयत्नरत आहे. त्यासाठी शासन उमेद अभियानाच्या माध्यमातून कमी दरात कर्ज उपलब्ध करून देते. मात्र, बचतगटाच्या महिला या कर्जाचा उपयोग व्यवसायासाठी न करता अधिक व्याजाने (पाच ते दहा टक्के) कर्ज देत अवैध सावकारी करीत असल्याचे चित्र शहरासह ग्रामीण भागात आहे. त्यामुळे शासनाच्या उद्देशालाच हरताळ फासला जात आहे.


शेतीचा हंगाम बिन भरोशाचा असल्याने व महागाई वाढल्याने शेतकरी, शेतमजुरांचे आर्थिक गणित बिघडते. अशा परिस्थितीत बँकांचा दरवाजा ठोठावला जातो. मात्र, बँकेच्या क्लिष्ट त्रुटी पाहून शेतकरीच चक्रावतो. बँक नको ते कारण सांगून कर्ज देण्यास टाळत असल्याने पर्यायाने शेतमजुरांना बाहेरील कर्ज घ्यावे लागते. याचाच फायदा बचतगटाचे नाव सांगून अनेक जण अवैध सावकारी करीत गरिबांची पिळवणूक करीत आहेत.

### अशी आहे शिक्षेची तरतूद

**बेकायदेशीर सावकारीच्या समूळ उच्चाटनासाठी व बेकायदेशीर सावकारांना पायबंद घालण्यासाठी शासनाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अध्यादेश २०१४ हा सुधारित कायदा संपूर्ण राज्यभर लागू केला आहे. या नव्या कायद्याच्या तरतुदीनुसार विनापरवाना सावकारी करणा?यास पाच वर्षांपर्यंत कैदेची शिक्षा किंवा ५० हजार रुपयांपर्यंतच्या दंडाच्या शिक्षेची तरतूद केली आहे.**

### कर्ज वाढल्याने मानसिक दडपण

**जास्त दराने व्याजाचे पैसे व परतफेडीस विलंब झाल्यास कर्जाच्या रकमेत वाढ होते. कर्ज वसुलीचा तगादा सुरू असल्याने अनेक जण मानसिक दडपणात आहेत. यातूनच एखाद्याने आत्महत्येसारखे पाऊल उचलले तर त्याची जबाबदारी कुणाची असेल?**



बचतगटाच्या माध्यमातून महिलांची उन्नती साधावी, यासाठी शासनाचा उद्देश चांगला असला तरी काही महिलागटाच्या नावाखाली इतरांना व्याजाने पैसे देत व्याजाचा धंदा करीत आहेत. विशेष म्हणजे, हे व्याज एक किंवा दोन टक्के नसते तर थेट पाच ते दहा टक्क्यांपर्यंत आहे. बचतगटाच्या इतर महिलांचा दम सांगत वसुली करीत असल्याने कर्जदारांची मानसिकता खालावली जात आहे. परिणामी, अनुचित घटनांमध्ये वाढ होत आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देऊन आळा घालण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## सडक अर्जुनी येथे प्रकल्प आढावा बैठक उत्साहात.

**सडक अर्जुनी.**–श्री गुरुदेव सेवा मंडळ शाखा पळसगाव/ सोनका,ता.साकोली जि. भंडाराच्या वतीने ९ जून रोजी जिल्हा परिषद हायस्कूल सडक अर्जुनी येथे श्री गुरुदेव सुसंस्कार गुरुकुल प्रकल्पाची नव्याने उभारणी करण्याकरिताआढावा बैठक घेण्यात आली.सदर आढावा बैठकीमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी हा ग्रामगीतेच्या तत्त्वप्रणालीवरून आदर्श विद्यार्थी बनावे,सुसंस्कारीत विद्यार्थी बनवा आणि आदर्श माणूस बनावा या संकल्पना आणि उद्दिष्ट पुढे ठेवून श्री गुरुदेव सुसंस्कार गुरुकुल प्रकल्प गोंदिया जिल्ह्यात सुरू करण्याचा प्रयत्न आहे. या गुरुकुलाच्या माध्यमातून गावे जागृत होतील, गावांमधील एकनिष्ठता, अखंडता वाढेल, गाव आदर्श वाटचालीकडे जातील, आणि गावावरून आपल्या देशाचे भवितव्य उज्वल होईल.आदी सर्व गोष्टींचे अवलोकन करून ही आढावा बैठक उत्साहात पार पडली,बैठकीला मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

# कोदामेडी ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी राऊत



**सडक अर्जुनी:** तालुक्यातील कोदामेडी, केसलवाडा गट ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी निशांत राऊत यांची सोमवारी (दि.१०) एकमताने निवड करण्यात आली. कोदामेडी केसलवाडा येथील उपसरपंचावर यावर्षी एप्रिल महिन्यात अविश्वास ठराव पारित करण्यात आला होता. त्यामुळे येथील उपसरपंच पद रिक्त झाले होते. रिक्त झालेल्या पदासाठी सोमवारी निवडणूक घेण्यात आली. एकूण नऊ सदस्य असलेल्या ग्रामपंचायत उपसरपंचपदी बिनविरोध निशांत राऊत यांची निवड करण्यात आली. यावेळी उपसरपंचपदासाठी एकच अर्ज दाखल करण्यात आला होता. त्यामुळे बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणुकीची प्रक्रिया तहसील कार्यालयाचे मंडळ अधिकारी वरकडे यांनी पार पाडली.

यावेळी सरपंच विनोद पुराम, ग्रामपंचायत सदस्य रामदास भीवगडे, सुलोचना मुनीश्वर, रोशनी शेलारे, कामिनी चांदेवार, कुसूम तरोणे, अजूम खान आदी उपस्थित होते.

# केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या अंमलबजावणीत गोंदिया जिल्हा विभागात प्रथम

**गोंदिया :** अमृत महाआवास अभियान २०२२-२३ अंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना आणि राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणा?या जिल्हयांची निवड आज विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने केली आहे. केंद्र व राज्य पुरस्कृत अशा दोन्ही आवास योजनांच्या अंमलबजावणीत सरस कामगिरी करत गोंदिया जिल्ह्याने नागपूर विभागात प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनांच्या अंमलबजावणीत गोंदिया जिल्ह्याने प्रथम, भंडारा द्वितीय तर चंद्रपूर जिल्ह्याने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या अंमलबजावणीतही गोंदिया जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. चंद्रपूरने द्वितीय तर वर्धा जिल्ह्याने तृतीय क्रमांक पटकाविला आहे.



गोंदिया जिल्ह्याने प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत २४५० भूमिहीन लाभार्थ्यांपैकी सर्वच लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन दिली आहे. तसेच या योजनेंतर्गत मंजूर ९५ हजार २९१ मंजूर घरकुलांपैकी ९२ हजार ९७२ घरकुल उभारली असून उर्वरित ६ हजार १६८ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. चंद्रपूर जिल्ह्यांने २ हजार ८५८ भूमिहीन लाभार्थ्यांपैकी १ हजार ८९१ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन दिली तर ४१ हजार ९२३ मंजूर घरकुलांपैकी ३७ हजार ७५० घरकुल उभारली आहेत. भंडारा जिल्ह्याने ५ हजार ९२९ भूमिहीन लाभार्थ्यांपैकी ४ हजार ४९५ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन दिली तर ६३ हजार ४६३ मंजूर घरकुलांपैकी ५९ हजार ३०१ घरकुल उभारली आहेत.

राज्य पुरस्कृत आवास योजनेंतर्गत गोंदिया जिल्ह्याने १२ हजार ५७६ मंजूर घरकुलांपैकी १२ हजार २४० घरकुल उभारली आहेत. चंद्रपूर जिल्ह्याने २३ हजार २७५ मंजूर घरकुलांपैकी २२ हजार ९९० घरकुल उभारली आहेत तर वर्धा जिल्ह्याने ११ हजार १७० मंजूर घरकुलांपैकी १० हजार ३२५ घरकुल उभारली आहेत.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना -ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव मुक्त वसाहत योजना आदी ग्रामीण गृह निर्माण योजना राज्यभर राबविण्यात येतात. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणा?या जिल्हा व तालुक्यांना २० नोव्हेंबर २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनापासून राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतीमान करण्यासाठी व गुणवत्ता वाढीसाठी अमृत महाआवास अभियान २०२२-२३ अंतर्गत पुरस्काराने गौरविण्यात येते. या पुरस्कार योजनेंतर्गत नागपूर विभागातील जिल्हे व तालुक्यांच्या कामगिरीवर आधारित प्रस्तावांचा अभ्यास करुन विभागीय आयुक्त श्रीमती बिदरी यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या अंमलबजावणी व सनियंत्रण व मुल्यमापन समितीने केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या अंमलबजावणीत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रत्येकी तीन जिल्हे व तालुक्यांची निवड केली आहे.

निवड समितीत आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त रवींद्र ठाकरे, सहायक कामगार आयुक्त राजदीप धुर्वे, विभागीय आयुक्त कार्यालयातील महसूल उपायुक्त दिपाली मोतीयेळे, उपायुक्त पुरवठा जळेकर, उपायुक्त विकास कमलकिशोर फुटाणे आदींचा समावेश आहे. अमृत महाआवास अभियान २०२२-२३ अंतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे, घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजुरी देणे, मंजुर घरकुलांना सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे आदी उपक्रम राबविण्यात येतात.

# नुकसान ग्रस्त भागाचे पंचनामे तात्काळ करा : जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले




**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यातील, तालुका गोंदिया येथील ग्राम चुटिया येथे चक्रीवादळामुळे व पावसामुळे घरांचे मोठे नुकसान झाल्याची बातमी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांना प्राप्त झाली होती. क्षेत्रातील अनेक नागरिकांनी झालेल्या नुकसानी बाबत त्यांना कळविले होते. नुकसानीचा आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी चक्रीवादळाने नुकसान झालेल्या ग्राम चुटीया येथे जाऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली तसेच नुकसानग्रस्त कुटुंबाची भेट घेतली.

दरम्यान अनेक घरांची पडझड झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा आणि नुकसानग्रस्त कुटुंबांना नुकसानी भरपाई मिळावी अशा सूचना त्यांनी अधिकारी वर्गाला दिलेल्या आहेत. नुकसानभरपाई लवकरात लवकर मिळावी यासाठी शासनदरबारी पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन नुकसानग्रस्त कुटुंबांना पंकज रहांगडाले यांनी दिले. यावेळी क्षेत्राचे जिल्हा परिषद सदस्य आणि सभापती योपेंद्रसिंह (संजू) टेंभरे, अजित टेंभरे, दुर्गाप्रसाद ठाकरे, दिलीप बोपचे, गणराज पटले, व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आता विधानसभाही काबीज करू

## महाविकास आघाडीतील नेत्यांना विश्वास; लोकसभेच्या निकालावरून चित्र पालटले

**गोंदिया** : भंडारा–गोंदिया मतदारसंघ हा खासदार प्रफुल्ल पटेल यांचा बालेकिल्लाच.. तिरोड्यात आणि अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रात सत्ताधारी सरकारचे आमदार व माजी मंत्री अशा दिग्गज नेत्यांची तोफ...तरीही महायुतीच्या उमेदवाराला पराभवाला सामोरे जावे लागले. काँग्रेससह महाविकास आघाडीला बळ आले. तथापि, कळीचे मुद्दे, भाजपच्या नेत्यांचे हवेतील मुद्दे यामुळे मतदारांनी महाविकास आघाडीला भरभरून मते दिली. त्यामुळे काँग्रेसचे डॉ. प्रशांत पडोळे यांना ही निवडणूक जिंकणे शक्य झाले.



### विधानसभा क्षेत्रनिहाय मिळालेली आघाडी

**काँग्रेसचे डॉ. प्रशांत पडोळे यांना भंडारा विधानसभा क्षेत्रातून २२,८५३; तुमसरमधून ९०१६; साकोलीमधून २७,३६६ आणि अर्जुनी मोरगावमधून २०,६५८ मतांची आघाडी मिळाली. तसेच भाजपचे सुनील मेंढे यांना तिरोडा विधानसभा क्षेत्रातून ८,९३८ आणि गोंदियामधून ३५,४९९ मतांची आघाडी मिळाली.**

आपल्या बाजूने आलेल्या निकालानंतर आगामी विधानसभा आम्हीच काबीज करू, असा विश्वास महाविकास आघाडीच्या नेत्यांना आहे.

भंडारा–गोंदिया लोकसभा क्षेत्राकरिता १९ एप्रिल रोजी मतदान झाले. तब्बल १८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. मात्र, खऱ्या अर्थाने महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातच खरी लढत होईल, हे स्पष्ट होते. महायुतीकडून तत्कालीन खासदार सुनील मेंढे आणि महाविकास आघाडीकडून डॉ. प्रशांत पडोळे हे उमेदवार होते. यंदाच्या या निवडणुकीत पाहिजे तसा प्रचार झाला नाही. सोशल मीडियाचा प्रचारासाठी अधिक वापर केला गेला. यातही महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे हे स्वतः खासदार असताना त्यांचा विजय निश्चित मानला जात होता. त्यामुळे पदाधिकारी आणि कार्यकर्तेही निश्चिंत होते. मात्र, ४ जूनला निवडणुकीचा निकाल हाती आला आणि मतदारांनी महायुतीच्या उमेदवाराला घरचा रस्ता दाखविला.

या निवडणुकीत महायुतीचा उमेदवार विजयी व्हावा, यासाठी खासदार प्रफुल्ल पटेल यांनी जोरदार प्रचार केला. त्यांना यातूनच नाना पटोले यांना आपली ताकद दाखवून द्यायची होती. दुसरीकडे महाविकास आघाडीतून डॉ. प्रशांत पडोळे यांना उमेदवारी दिल्यावर भाजप व इतर सर्वच पक्षांनी त्यांना डमी उमेदवार असे संबोधले होते. मात्र, जनतेच्या मनातील असंतोष आणि त्याच्या जोडीला काँग्रेसने हाताळलेले मुद्द्यावर नेण्यात अपयश आले, तर दुसरीकडे गोंदिया, तिरोडा वगळता अर्जुनी मोरगाव, साकोली, भंडारा, तुमसर या विधानसभा क्षेत्रात आघाडी मिळविण्यात महाविकास आघाडीला यश आले. दरम्यान, लोकसभा सहजरित्या

### चला घरट्यात परतूया...

**२०१९ मधल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये प्रवेश केला होता. सत्तेच्या प्रवाहात ते गेले असले तरी बहुतेक नेत्यांना घरवापसीची ओढ लागली आहे. तसे बोललेही जात आहे. मात्र, त्यांच्या परतीवर प्रदेश काँग्रेसमधील हायकमांडच निर्णय घेतील, असेही सांगितले जात आहे. एकंदरीत प्रदेश काँग्रेसने ग्रीन सिग्नल दिल्यास काँग्रेस सोडून भाजपमध्ये गेलेले अनेक नेते घरवापसी करण्याची शक्यता अधिक आहे.**

### घड्याळ सोडून पकडणार काँग्रेसचा हात

**राज्यात काही महिन्यांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट असे दोन गट तयार झाले. जिल्ह्यातील अजित पवार गटातील बरेच पदाधिकारी घड्याळ सोडून काँग्रेसचा हात धरणार असल्याचे बोलले जात आहे. हे चित्र लवकरच अर्थात विधानसभेच्या पूर्वी दिसेल, असेही सांगण्यात येत आहे.**

राजकारणात नव्याने आलेल्या आणि महाविकास आघाडीकडून निवडणूक लढत असलेल्या डॉ. प्रशांत पडोळे यांनी मोठ्या फरकाने महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांचा पराभव केला.

उल्लेखनीय म्हणजे, सुनील मेंढे यांच्या उमेदवारीला विरोध व जनमाणसात नाराजी असली तरी महायुतीने त्यांना तिकीट दिले. परंतु, भाजपसह महायुतीच्या घटक पक्षांना निवडणूक विकासाच्या मोठ्या फरकाने झालेला पराभव महायुतीच्या पदाधिकाऱ्यांच्या जिव्हारी निश्चितच लागला असून, त्यांना आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे.

का पक्षात अख्खे आयुष्य घालविणारा नेता सत्ता आणि मंत्रिपदाच्या लालसेपोटी नेमका कुठे आणि केव्हा जाईल, याचा नेम नसल्याचे यापूर्वी दिसून आले. २०१९ च्या मोदी लाटेत काँग्रेसच्या काही स्थानिक पदाधिकऱ्यांनी काँग्रेसचा हात सोडून भाजपचे कमळ हाती घेतले. अलीकडे राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस असे दोन पक्ष फुटले; नव्हे फोडण्यात आले. असे मतदारांच्या मनात घट्ट ठासून राहिले. असले फोडाफोडीचे राजकारण त्यांच्या पचनी पडले नाही. सोबतच विकास बाजूला सारून महागाई, शेतकरी विरोधी धोरणाबाबतची चिड इथल्या मतदारांमध्ये होती. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत त्यांच्यातील चीड मताच्या रूपातून दाखवून दिली. कुठल्याही मातब्बर नेत्यांचा बालेकिल्ला का असेना मतदारांनी हा किल्लाच ढासळून टाकला.

काबीज केल्यानंतर आता काँग्रेससह महाविकास आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना बळ आले आहे. महाराष्ट्रात मोठा भाऊ ठरलेल्या काँग्रेसच्या नेत्यांचा आनंद चेहऱ्यावर झळकत आहे. लोकसभा जिंकली आता आगामी विधानसभाही काबीज करू, असा विश्वास महाविकास आघाडीतील नेत्यांना आहे. त्यादृष्टीने आपण काम करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. दुसरीकडे

# वंचितच्या मताधिक्यात घट, पंजाचा विजय

## आजी–माजी आमदार नापास, भाजपाच्या पराभवाने आत्मचिंतनाची गरज

**डॉ.प्रशांत पडोळे–९२,४५५**
**सुनील मेंढे–७१,७९७**
**मताधिक्य–२०,६५८**

**अर्जुनी मोरगाव:** लोकसभा निवडणुकीचे उत्कंठावर्धक निकाल आले. संमिश्र कौल देणाऱ्या अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रात मतदारांनी यावेळी काँग्रेस उमेदवाराला प्राधान्यक्रम दिल्याचे निकालावरुन स्पष्ट होते. वंचित बहुजन आघाडी व बहुजन समाजवादी पार्टीच्या बहुतांश मतदारांनी यावेळी काँग्रेसला पसंती दिली. त्यामुळे काँग्रेसच्या विजयावर शिक्कामोर्तब झाल्याच्या चर्चा मतदारसंघात आहेत. लोकसभा निवडणुकीपुर्वी एनडीए आघाडीत सामील झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मुळे ताकद वाढली असतानाही भाजपचा झालेला पराभव हा आत्मचिंतनाचा विषय आहे. मात्र भाजपच्या अनेक उमेदवारांच्यावतीने ४०० पारचा नारा देत संविधानात बदल करण्याचा दिलेला इशारा या मतदारसंघातील मागासवर्गीय मतदारांनी आपल्या मनात ठासून घेत संविधानाचे रक्षण करायचे आहे हे ठरवित बसप,वंचितकडे नेहमी जाणारा मतदान यावेळी विभाजन होऊ नये याची काळजी घेत काँगेसला पडल्याने भाजपच्या उमेदवाराला मताधिक्य मिळविता येऊ शकले नाही.त्यातच काँग्रेस नेते नाना पटोलेंचा मतदारसंघ राहिलेला असल्याने पटोलेंच्या राजकीय वजन वाढीकरीता सुध्दा येथील मतदारांनी तसेच भाजपचे माजी सभापती अरविंद शिवणकर यांच्यासोबत पक्षाने केलेल्या अन्यायाचा फटकाही बसल्याचे बोलले जात आहे.

अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्र अनु.जाती प्रवर्गासाठी राखीव आहे. या मतदारसंघात अनुसूचित जाती, जमाती व नामाप्रची मते सर्वाधिक आहेत. हे क्षेत्र संमिश्र कौल देणारे आहे. या मतदारसंघात ९७८,८१६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. भाजपने सुनील मेंढे यांची उमेदवारी कायम ठेवली. तर काँग्रेसने डॉ. प्रशांत पडोळे या राजकारणात नवख्या असलेल्या उमेदवाराला उमेदवारी दिली.






वंचित बसपाचे मताधिक्य घटले

बहुजन समजा पार्टीचे संजय कुंभलकर यांना केवळ २७,१९ (१.५२ टक्के तर वंचित बहुजन अघाडीचे संजय केवट यांना ६,६३९(३.७१ टक्के) मते मिळाली. जातीय मतांचे विभाजन करण्याच्या दृष्टीने राजकीय पक्षांनी प्रयत्न केले असले तरी मतदारांनी ते हेरले व

### आजी–माजी आमदार नापास

**अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आ.मनोहर चंद्रीकापुरे हे राष्ट्रवादी काँग्रेसच (अजित पवार गट) आहेत. तर भाजपचे माजी आ.राजकुमार बडोले यांचीसुद्धा या मतदारसंघात बऱ्यापैकी पकड आहे. आजी–माजी आमदारांनी जोर लावल्यानंतरही भाजपा उमेदवाराला या मतदारसंघात २० हजार ६५८ मतांचा खड्डा पडला. त्यामुळे आजी–माजी आमदार मताधिक्य मिळवून देण्यात फेल ठरले आहेत.**

प्रमुख पक्षांच्या पारड्यात आपली मते टाकली. त्यामुळे सदैव निर्णायक ठरणाऱ्या बीएसपी व वंचित बहुजन आघाडी या पक्षांचे मताधिक्य घटले. याचा फायदा काँग्रेसचे डॉ. प्रशांत पडोळे यांना झाला.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे हा मतदारसंघ सध्या असून कुठेतरी विद्यमान आमदाराप्रती असलेली नाराजी आणि २५ वर्षानंतर निवडणूकीत आलेला पंजा निवडणूक चिन्हे हे काँग्रेसच्या उमेदवाराला संजिवनी देणारे ठरले.या मतदारसंघातील अर्जुनी मोरगाव,सडक अर्जुनी व गोरेगाव तालुक्यातील सर्वच भागात काँग्रेसने आघाडी घेतली.विशेष म्हणजे अजित पवार गटातील काही नेत्यानी भाजपचा प्रचार करण्यास स्पष्ट दिलेला नकार सुध्दा भाजपला तोट्याचे ठरलेला दिसून येतो.

# गोंदिया मतदारसंघाने ठेवले भाजपचे मताधिक्य कायम

## शेवटच्या टप्प्यातील सभांचा झाला लाभ, विनोद अग्रवाल उत्तीर्ण, आता विधानसभेत मताधिक्य ठेवण्याचे आव्हान

**गोंदिया:** भंडारा–गोंदिया लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीचा निकाल मंगळवारी (दि.४) जाहीर झाला. या मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे यांनी भाजपचे सुनील मेंढे यांचा पराभव केला. मेंढे यांचा या निवडणुकीत पराभव जारी झाला असला तरी गोंदिया विधानसभा मतदारसंघाने त्यांना ३५ हजार ५५९ मतांची लीड दिली. तर सन २०१९ च्या निवडणुकीत त्यांना जवळपास ४० हजारांची लीड मिळाली होती. मतदारसंघातील मताधिक्य कायम राहिल्याने या मतदारसंघाचे विद्यमान अपक्ष आ.विनोद अग्रवाल व सोबतच माजी आमदार गोपालदास अग्रवाल हे सुध्दा उत्तीर्ण झाले आहेत.

गोंदिया विधानसभा मतदारसंघ काँग्रेसचा गड होता. पण सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत अपक्ष आ.विनोद अग्रवाल यांनी काँग्रेसचा गड भेदला होता. या लोकसभा निवडणुकीत त्यांनी महायुतीला समर्थन दिले होते. त्यामुळे महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांना मताधिक्य मिळवून देण्याचे आव्हान त्यांच्यासमोर होते. पाच महिन्यांनी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने मताधिक्य कायम ठेवणे गरजेचे होते. यात आ.अग्रवाल हे उत्तीर्ण झाले. त्यांनी गेल्या साडेचार वर्षात मतदारसंघात केलेली बांधणी, विकासकामे, तगडा जनसंपर्क आदी बाबी मेंढे यांचे मताधिक्य वाढविणार महत्वपूर्ण ठरल्या. पण आता हे मताधिक्य पाच महिन्यांनी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत कायम ठेवण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे.



### सन २०१९ ला मिळाली होती आघाडी

**गोंदिया विधानसभा मतदारसंघातून सन २०१९ च्या निवडणुकीत भाजपचे उमेदवार सुनील मेंढे यांना १,१२,११३ मते मिळाली होती. तेव्हा जवळपास ४० हजार मतांची आघाडी त्यांनी घेतली होती. सन २०२४ च्या निवडणुकीतही ही आघाडी कायम राहिली. मात्र मेंढे यांना इतर चार मतदारसंघात कमी मते मिळाल्याने त्यांना पराभवाचा सामोरे जावे लागले.**

### अखेरच्या टप्प्यातील सभा महत्वपूर्ण

**आमदार विनोद अग्रवाल यांनी लोकसभा निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्यात सुनील मेंढे यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा घेतली. ही सभा बऱ्याच प्रमाणात मताधिक्य कायम ठेवण्यासाठी महत्वपूर्ण ठरली असल्याचे आता निकालाअंती दिसून येत आहे.**

मतदानात आघाडीचे श्रेयाचे राजकारण सुरु होताच महायुतीतील घटक पक्षात धुसफुस सुरु झाली असून मताधिक्य तुमच्यामुळे वाढले तर पराभवाची जबाबदारी कुणाची असा सवाल उपस्थित केला जाऊ लागला आहे.

गोंदिया विधानसभा मतदारसंघात आपल्यामुळेच मताधिक्य मिळाल्याचे पत्रक काढून सांगितले गेल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख मुकेश शिवहरे यांनी तर श्रेयवादाचे राजकारण कुणी करु नये असा सल्लाच दिला आहे.




**सुनील मेंढे–१,१०,८८१**
**डॉ.प्रशांत पडोळे–७५,३१२**
**मताधिक्य–३५,५७५**

२०१९ च्या लोकसभा निवडणूकीत मिळालेल्या मताधिक्यापेक्षा कमी मताधिक्य यावेळी मिळाल्याने मतदारसंघातील मुस्लीम व मागासवर्गीय मतदारांने भाजपला मतदान देण्याचे टाळले असे दिसून येत आहे.

# खरीप हंगामाकरीता ५१ हजार क्विंटल बियाणांची मागणी

**गोंदिया:** यंदाच्या खरीप हंगागात कृषी विभागाने ५१ हजार ८१६ क्विंटल बी–बियाणांची मागणी केली आहे. यंदा हवामान खात्याने समाधानकारक पावसाचा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे बी–बियाणांची मागणी वाढेल, असा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे. कृषी खात्याने येणारा खरीप हंगाम साधण्यासाठी कंबर कसली आहे. तर बळीराजाही सज्ज झाला असून शेतमशागतीच्या कामात व्यस्त दिसत आहेत. जिल्ह्यात यंदाच्या हंगामासाठी २ लाख २० हजार १०८ हेक्टर क्षेत्र पीक लागवडीसाठी प्रस्तावित आहे. यात सर्वाधिक २ लाख १३ हजार ७१७ हेक्टर क्षेत्रात धानाची लागवड करण्यात येईल.

६,०३१ हेक्टर क्षेत्रात तूर, २८ हेक्टर क्षेत्रात मुंग, ५८ हेक्टर क्षेत्रात उडीद आणि २७५ हेक्टर क्षेत्रात ढेंचा लागवड करण्यात येणार आहे. त्यामुळे बी–बियाणेही मोठ्या प्रमाणात लागणार आहेत. महाबीजकडून ३१ हजार ७६ क्विंटल तर खाजगी बियाणे कंपनीकडून २० हजार ७७० क्विंटल बियाण्यांची मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि कीटकनाशकांचा तुटवडा निर्माण होणार नाही, याची काळजीही कृषी विभागामार्फत घेतली जाणार आहे. विशेषत: सर्वाधिक धान बियाणांचा पुरवठा केला जाणार आहे. शेतकऱ्यांना अनुदानावर बियाणे उपलब्ध करून देण्यात येत असले तरी ते नाममात्र असते. त्यामुळे शेतकऱ्यांना खासगी दुकानांतून बी–बियाणे खरेदी करावे लागते. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसू लागला आहे.




यंदा अवकाळी पावसाला प्रारंभ झाला आहे. त्यामुळे मशागतीच्या कामांनाही वेग आला आहे. वेळेत खरीप हंगाम सुरू होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. यासाठी कृषी खात्यालाही वेळेत बी–बियाणे, खते आणि कीटकनाशके पुरवावी लागणार आहेत. शिवाय कृत्रीम टंचाई निर्माण करून बी–बियाणे आणि खते विकणाऱ्यांवर भरारी पथकांची नजर राहणार आहे. जिल्ह्यात २२० लाख हेक्टरमध्ये पेरणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यानुसार बियाणे आणि खते व यंत्र सामुग्री पुरविली जाणार आहे. सर्व कृषी केंद्रांमध्ये आवश्यक ते बी–बियाणे विक्रीसाठी ठेवली जाणार आहेत. कोठेही बी–बियाणे आणि खतांचा तुटवडा निर्माण होणार नाही. त्याची खबरदारी कृषी विभागाकडून घेतली जाणार असल्याचे प्रभारी जिल्हा कृषी अधिकारी महेंद्र मडामे यांनी सांगितले.

# तिरोडा मतदारसंघात भाजपचे मताधिक्य घटले

## दोन दशकांपासून भाजपाचे वर्चस्व: काँग्रेसची चार हजार मते वाढली

**सुनील मेंढे–८२,७००**
**डॉ.प्रशांत पडोळे–७३,७६२**
**मताधिक्य–८,९३८**

**तिरोडा:** भंडारा–गोंदिया लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघापैकी तिरोडा हा एक महत्वपूर्ण मतदारसंघ आहे. हा मतदारसंघ भाजपाचा गड समजला जातो. गेल्या दहा वर्षापासून या मतदारसंघात भाजपचे वर्चस्व असून आ.विजय रहांगडाले हे या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करीत आहे. या मतदारसंघाने भाजप उमेदवाराला लीड दिली असल्याचे गेल्या दोन निवडणुकांवरुन दिसून येते. सन २०१९ च्या निवडणुकीत या मतदारसंघातून भाजप उमेदवाराला २० हजार ७०७ मतांची लीड मिळाली तर या निवडणुकीत ८९३८ मतांची लीड मिळवून देण्यात आमदार उत्तीर्ण झाले असले तरी मागील निवडणुकीच्या तुलनेत जवळपास ११ हजार मतांनी कमी झालेली लीड विचार करायला लावणारी आहे.

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे उमेदवार सुनील मेंढे यांना ८२ हजार ७००, काँग्रेसचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे यांना ७३७६२ मते मिळाली. बसपाचे संजय कुंभलकर यांना २३२३ मते मिळाली. तर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचे उमेदवार सुनील मेंढे यांना ८९१४४, राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार नाना पंचबुद्धे यांना ६८४३७ आणि बसपाच्या विजया नंदूरकर यांना ४९३५ मते मिळाली होती. ही आकडेवारी पाहता भाजप उमेदवाराचे मताधिक्य जवळपास ११ हजारांनी कमी झाले आहे. तर काँग्रेसचे उमेदवाराचे मताधिक्य हे ५ हजारांनी वाढले आहे. त्यामुळे या निवडणुकीत भाजपा उमेदवाराला लीड मिळाले असले तरी कमी झालेले मताधिक्य हे विद्यमान आमदार आणि भाजपला आत्मचिंतन करायला लावणारे आहे. कारण तीन महिन्यांवर विधानसभेची निवडणूक असून याचा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.






या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष,शिवसेना शिंदे गट,राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गट म्हणजेच प्रफुल पटेल यांचा गट व आरपीआय़,मनसेसह अनेक पक्षांची युती होती.प्रफुल पटेलांचा पक्ष भाजपसोबत असल्यानंतर भाजप उमेदवाराच्या मतदानात वाढ होणार अशी गणिते मांडली जात होती.परंतु पटेलांच्या राष्ट्रवादीचेही मतदान भाजप उमेदवाराला पडल्याचे

### भाजप करणार का मंथन

**तिरोडा मतदारसंघाने भाजपा उमेदवाराला साथ दिल्याने गेल्या दोन निवडणुकांवरुन दिसून येते. तर स्थानिक आ.विजय रहांगडाले यांचा तगडा जनसंपर्क मतदारसंघावरील पकड, विकास कामे ही जमेची बाजू आहे. पण गेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत मताधिक्य का कामी झाले यावर मंथन करण्याची भाजपला गरज आहे.**

चित्र तिरोडा मतदारसंघात दिसून येत नाही.तिरोडा मतदारसंघातील गोरेगाव तालुक्यातील सर्वच जिल्हा परिषद गटामध्ये महाविकास आघाडीने महायुतीला मागे टाकले आहे.गोरेगाव तालुक्याचा सरासरी विचार केल्यास भाजपपेक्षा काँग्रेसला अधिक मतदान पडले आहे.त्यामध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष पकंज रहागंडाले यांच्या जिल्हा परिषद मतदारसंघाचाही समावेश आहे.

तिरोडा विधानसभा मतदारसंघात ११ हजार मताने कमी झालेले मताधिक्य हे विधानसभा निवडणुकीत धोक्याचे ठरणार आहे.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवा नेते रविकांत बोपचे यांनी विधानसभा निवडणुकीनंतर सातत्याने ठेवलेला संपर्क गावागावापर्यंत पोचून पक्षसंघटन मजबूत करण्याचे केलेले कार्य महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनीही लावलेली ताकद आणि एकत्रितपणे केलेले काम आघाडीच्या उमेदवाराला २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत अधिक मतदान मिळवून देण्यात यशस्वी ठरले आहे.

# पडोळे,मेंढे वगळता इतर सर्वांच्या मतांची बेरीज 9 लाखांच्या आतच

### अपक्षांना २५ हजारांची मजलही गाठता आली नाही

**गोंदिया:** भंडारा–गोंदिया लोकसभा क्षेत्रात भाजपचे सुनील मेंढे व काँग्रेसचे डॉ. प्रशांत पडोळे यांच्यातच थेट लढत झाली. निवडणूक रिंगणात एकूण १८ जण होते. पण पडोळे, मेंढे वगळता या १६ जणांसह नोटा मिळून सर्वांच्या मतांची बेरीज सव्वा लाखाच्या जवळ नाही.

१६ जणांना केवळ ९६ हजार ५०७ इतकी मते मिळाली, तर नोटाला १० हजार २५८ मतांचा कौल मिळाला.

### आंबेडकरवादी पक्षांची मते विभागली

**आंबेडकरवादी पक्षांची एकजूट दिसून आली नाही. बसपा, बीआरएसपी, वंचित बहुजन आघाडी तसेच पिाईच्या विविध गटांनी स्वतंत्ररित्या निवडणूक लढविली. तर काहींनी काँग्रेसला तर काहींनी भाजपला पाठिंबा दिला. त्यामुळे आंबेडकरवादी पक्षांची मते विभागली गेली.**

### बसपा तिसऱ्या स्थानी, पण मताधिक्य अर्ध्यावर

**लोकसभा निवडणुकीत गतवेळी बहुजन समाज पार्टीने ५२,२०५ मते मिळाली होती. बसपाने तिसरा क्रमांक मिळवला होता. यावेळी बसपा तिसऱ्याच स्थानी आहे. पण मताधिक्य हे २५,४६२ म्हणजे अर्ध्यावर आले आहे. तर वंचित बहुजन आघाडीच्या मताधिक्यात घट झाली आहे. गतवेळी ४३ हजार तर यावेळी केवळ २४,८५८ मते मिळाली आहे. बसपा आणि वंचितचे मताधिक्य अर्ध्यावर आले असून हे मताधिक्य आत्मचिंतन करण्यास भाग पाडणारे आहे.**

या सगळ्यांना मिळून केवळ ९६ हजार ५०७ मते मिळविला आली. तब्बल १६ उमेदवारांनी डिपॉजीट गमावले.

# भाजपाच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसने लावला सुरूंग

## नामदेव किरसान यांना आघाडी, भाजपाचे मताधिक्य घटले

**आमगाव:** गडचिरोली–चिमुर लोकसभा क्षेत्रात सलग दोन पंचवार्षिक विजय संपादन करणारे भाजपाचे खा.अशोक नेते यांना या लोकसभा निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागले. अशोक नेते यांना आमगाव व अहेरी या दोन विधानसभा मतदारसंघात मागील निवडणुकीप्रमाणे मताधिक्य राखला आले नाही. तर काँग्रेसचे उमेदवार डॉ. नामदेव किरसान यांना १०८६९ मतांची लीड मिळाली आहे.

आमगाव विधानसभा मतदारसंघ भाजपाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो.या क्षेत्रात अनेक भाजपाचे आमदार, खासदार व मंत्री यांनी प्रतिनिधीत्व केले आहे. त्यामुळे भाजप उमेदवार अशोक नेते यांना सर्वाधिक मताधिक्य मिळणे अपेक्षित होते. परंतु असे न होता भाजप उमेदवार नेते यांना ८१६९५ मते मिळाली तर काँग्रेस उमेदवार किरसान यांना ९२५६४ मते मिळाली. काँग्रेसला १०८६९ एवढ्या मतांचे मताधिक्य मिळाले. आमगाव विधानसभा क्षेत्राने नेहमीच लोकसभा निवडणुकीत भाजपला साथ दिली आहे. या मतदारसंघातून नेहमीच भाजप उमेदवाराला मताधिक्य मिळवून दिले आहे. परंतु या निवडणुकीत काँग्रेसची जादू चालली. त्यामुळे भाजपचा भ्रमनिराशा झाला. लोकसभा निवडणुकीनंतर आता तीन महिन्यांची विधानसभेच्या निवडणूका होणार आहेत. त्यामुळे खासदारांची परीक्षा संपली असली तरी आता आमदारांना परीक्षेला सामोरे जायचे आहे. या निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार अशोक नेते यांचा सव्वा लाखावर मतांनी पराभव केला. त्यामुळे हा पराभव निश्चितच भाजपाच्या जिव्हारी लागला असून त्यांना आता आत्मचिंतन करण्यास भाग पाडले आहे.



विशेष म्हणजे सालेकसा तालुक्यात काँग्रेसचे ४ जिल्हा परिषद सदस्य असतांना

### पराभवाच्या कारणांचा घेतला जातोय शोध

**भाजपाच्या दारुण पराभवामुळे पक्षाच्या प्रमुखासमोरही नवे आव्हान निर्माण झाले आहे. या विधानसभा क्षेत्रात आमदारही काँग्रेसचाच आहे. त्यामुळे पक्षांची विस्कटलेली घडी भाजपाला वेळीच सावरावी लागणार आहे. भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या या मतदारसंघात भाजप पिछाडीवर गेल्यामुळे भाजप पदाधिकाऱ्यांना आत्मचिंतन करुन कार्यपद्धती करण्याची गरज आहे. तर आता भाजपाचा उमेदवाराच्या पराभवाचे नेमके कारण काय याचा शोध भाजपचे स्थानिक नेते घेत असल्याची चर्चा आहे.**

### काँग्रेसला मिळाली नवसंजीवनी

**काँग्रेसचे उमेदवकर डॉ.नामदेव किरसान यांनी बाजी मारल्यामुळे लोकसभा क्षेत्रात काँग्रेसची ताकद वाढण्यास मदत तर होणाच आहे. परंतु त्यासोबत आमगाव विधानसभा क्षेत्राचे आ.सहषराम कोरोटे यांना व काँग्रेसला नवसंजीवनी मिळाली आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसला याचा फायदा कितपत होतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.**

तिरखेडी जिल्हा परिषद गटात ४४३ व झालिया जिल्हा परिषद मतदारसंघात २७४३ मताची आघाडी भाजप उमेदवार नेतेंना मिळाली.तर किरसान यांना कारुटोला जि.प.क्षेत्रात ६५९ व पिपरीया जिल्हा परिषद गटाने ६९२ मतांची आघाडी मिळवून दिली.सालेकसा तालुक्यात ९९५ मतांनी भाजप आघाडीवर असून नगरपंचायत क्षेत्रात मात्र काँग्रेस आघाडीवर आहे.